## प्रकरण ५

## रामचंद्रपंताची ताराबाईकालीन कारकीर्द:

औरंगजेबाविरूद्द चालू असलेल्या मराठा स्वातंत्र्य लढयाचे नेते आणि छत्रपती राजाराम महाराज मोगलांच्या उलट लढत असतानाच रायगड येथे मोगलाचा जोर पाहून सिंहगडावर परत आले आणि सिंहगडावरच आजारपणात तारीख २ मार्च १७०० रोजी मरण पावले. आपल्या मरणापूर्वी राजारामाने तेथे उपस्थित असलेल्या कर्त्या लोकांना सांगितले, "माझे मरणाने श्रमांत अंतर करून नका, शिवाजी मुद्दून येतील असे करा, सर्वजन रामचंद्रपंताचे आज्ञेत वागा."[१]

राजाराम महाराज मरण पावले, तेव्हा चिटणीस बखरीप्रमाणे त्याच्या राण्या, ताराबाई व राजसबाई या आपल्या मुलांच्या बरोबर पन्हाळगड येथे होत्या. तर तिसरी राणी अंबिकाबाई ही विशाळगड येथे होती.[२] कर्ता माणूस म्हणून रामचंद्रपंतच राजारामाच्या मृत्यूच्यावेळी सिंहगडावर हजर होता. बाकी बहुतेक सरदार मोगलांच्या विरूद्द लढण्यासाठी वेगवेगळ्या किल्ल्यांवर व वेगवेगळ्या भागात लढत होते. औरंगजेब तर सातारा-याजवळ येऊन छावणी टाकून बसलेला होता. अशा कठीण परिस्थितीत राजारामाच्या नंतर सर्व व्यवस्था पहाण्याची रामचंद्र पंतावर जबाबदारी पडलेली होती. त्याने राजारामाच्या मृत्यूची बातमी प्रथमत: त्याची राजकुटुंबीय मंडळी जी पन्हाळगड व विशाळगड येथे होती तेथे पोहचविली. त्यावेळी विशाळगड येथे असलेली राजारामाची पत्नी अंबिकाबाई सती गेली.[3] पन्हाळगड येथे ताराबाई आणि राजसबाई, या दोघींनी आपापल्या मुलांच्या संगोपनासाठी तथा महाराष्ट्रातील राजकरणासाठी राजारामाच्या पश्चात कामगिरी बजावण्याचे निश्चित केले.

---

१. मराठी रियासत., भाग १., पृ.६७५.
२. हेरवाडकर, र.वि., उपरोक्त., पृ.६४.
३. उपरोक्त., पृ. ६६.

राजारामाच्या मृत्यूनंतर रामचंद्रपंत अमात्य सिंहगडाहून पुण्याला गेले. तेथील बंदोबस्त केला. तेथून "पंचवीस हजार स्वार फौज ठेऊन आपण प्रतापगडी येऊन, श्रीचे दर्शन करुन, परलीस येऊन श्रीस्वामींचे समाधीचे दर्शन घेऊन, त्रिरात्र राहून, वसंतगडावरुन पन्हाळगडास आले. ताराबाईसाहेब व राजसबाईसाहेब यांसी भेटोन उभयतांचे दर्शन घेऊन महाराजांसाठी बहुत श्रमी जाहाले. त्याकाळी पंतानी बहुत रीतीने समाधानाच्या गोष्टी सांगोन समाधान केले."४

फोडा-झोडाचा औरंगजेबाचा डाव:

रामचंद्रपंताच्यावर राजारामाच्या मृत्यूनंतर मराठा राज्याची सर्व जबाबदारी होती. किंबहुना त्यावेळच्या कठीण परिस्थितीतून मार्ग काढणे त्यांच्यावरच अवलंबून होते. भीमसेन सक्सेनाने सांगितल्याप्रमाणे संताजी घोरपडयाच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्याचा मुलगा राणोजी घोरपडे आणि बंधू बहिरजी घोरपडे, हे दोघे ही धनाजी जाधवाच्या पाडावाचा प्रयत्न करत होते. धनाजीच्या बाजूलाही काही मराठा सरदारांचा पाठिंबा होता. मराठयांच्यामध्ये अशा त-हेचे दुहीचे राजकारण शिजत असताना त्यावर नियंत्रण करणे अत्यंत महत्त्वाचे होते. पण त्यावेळी राजाराम महाराजांचा संपूर्ण पाठिंबा रामचंद्रपंताना असल्यामुळे मराठयांच्यातील एकमेकाविरुध्दच्या वैराला जेथल्या तेथे थोपवून धरण्यात आले होते. ही कामगिरी करत असतानाच ब्रिज किशोर यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे रामचंद्रपंताने जहागीरी, इनाम व सरंजाम देण्याची पध्दत संभाजी महाराजाच्या वधानंतर जी सुरु केली होती, ती बंद करण्याचा मनोमन विचार केला होता. तसे करणे अर्थात सोपे नव्हते. कारण मराठा सरदारांना वतनाची लालूच लागली होती. म्हणूनच राजारामाच्या हयातीतच औरंगजेबाने

---

४. केरवाडकर, र. वि., उपरोक्त., पृ. ७०.

रामचंद्रपंत व परशुराम पंत यांना दोन वेगवेगळी पत्रे पाठवून त्यांच्यात वितुष्ट निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. राजारामाच्या मरणापूर्वी म्हणजे तारीख ३१ ऑक्टोबर १६९९ रोजी औरंगजेब बादशहाने ब्रम्हपुरीहून रामचंद्र पन्त यास पत्र पाठवले होते. पण ते पत्र परशुरामपंत त्र्यंबक यांच्या हातात मिळेल अशी योजना केल्याचे दिसते. कारण त्यातून त्या दोघांच्यामध्ये फूट पाडण्याचे औरंगजेबाचे कारस्थान होते.[5] औरंगजेबाचे ते पत्र असे--

"रामचंद्र (पंत अमात्य) यांनी जाणावें की दैव अनुकूल झाल्यामुळे तुम्हाला दूरदृष्टी आली आणि तुम्ही तरबियतखानाला (मोगल तोफखान्यावरील अधिकारी) पत्र लिहिले ते आमच्या वाचण्यात आले. पत्रात तुम्ही मांडलेल्या बहुतेक मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. तुम्ही आता एकनिष्ठेने सेवा करावी. तुम्ही लिहिले आहे त्याप्रमाणे तुम्ही त्वरीत अंमलबजावणी करावी. तुम्ही त्या दुर्दैवी आणि अपेशी माणसाला (राजारामाला) आपल्यामधून हाकलून लावावे. आता त्याचे आयुष्य थोडे बहुत शिल्लक असेल आणि आमच्या विजयी सैन्याच्या भीतीने तो पळ काढू पाहत असेल तर तुम्ही त्याचे सगळे किल्ले आम्हांला देऊन टाकावे. हे काम तुम्ही पार पाडलेत तर तुमच्यावर बादशहाची मोठीच कृपा होईल. तुमच्या जमातीमध्ये इतर कुणालाही मिळाला नाही असा दर्जा मानमरातब आणि इतमाम यांचा तुम्हांला लाभ होईल. जर का दुर्दैवाने स्वतःचे हित आणि नफानुकसान समजून घेण्याची तुम्हांला बुध्दी नसली आणि तुमच्या पत्रातील मजकूर खोटा असला तर लक्षात ठेवा. त्या काफराने (राजारामाने) आपले पुष्कळ अपराध केले आहेत आणि अतिशय उध्दटपणा दाखविला आहे. तो लवकरच आपल्या फौजेच्या तावडीत सापडेल आणि आपल्या नरकवासी भावाप्रमाणे (संभाजी) वध पावेल.

---

५.पसे तुहिंम्वणो., पृ. २०९-२१०.

आमच्या शक्तीचा प्रभाव तुम्हांलाही दिसून येईल. तुमची मालमत्ता नष्ट होईल. तुम्ही आपल्या प्राणास मुकाल. तुमच्या कुटुंबातील लहान-थोर अशी सर्व माणसे कैद होऊन वध पावतील."[६]

अशाच अर्थाचे आणि त्याच तारखेचे एक पत्र औरंगजेबाने परशुराम त्र्यंबक यांना पाठवलेले होते आणि त्या दोघांच्यामध्ये वितुष्ट निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. त्या पत्रामुळे परशुरामपंतांचा रामचंद्रपंतांच्या विषयी काही काळ गैरसमज झाला. पण लवकरच तो प्रकार औरंगजेबाने मराठ्यांच्यात दुही माजवण्यासाठी केल्याचे समजताच्च दोघेही परशुरामपंत व रामचंद्रपंत एकत्रपणे काम करु लागले. त्यांच्या अशा ऐक्यामुळेच त्यांनी औरंगजेबाचा सातारला पडलेला वेढा मोडून काढण्याचा निकाराने प्रयत्न केला. आणि मराठ्यांच्यामध्ये फूट पाडण्यात औरंगजेबाला यश आले नाही. सातारा मोगलांनी घेतला, हे खरे. पण त्यामध्ये मोगलांची फार प्रचंड हानी झालेली होती.[७] अशा धामधुमीच्या वेळी राजाराम महाराज नसल्याने मराठा राज्याचा कारभार चालविणे अत्यंत जोखमीचे व धाडसाचेही होते. पण रामचंद्रपंतांनी ती सर्व जबाबदारी स्वत:कडे घेतलेली होती.

<u>शाहूचे रामचंद्र पन्तास पत्र:</u>

पन्हाळ गडावर आल्यानंतरर रामचंद्र पंतानी ताराबाई व राजसबाई यांना राजाराम महाराजांच्या मृत्युची हकीकत सांगितली. तसेच शत्रू पाठीशी असताना कठीण परिस्थितीतून मार्ग कसा काढता येईल, याचीही त्याने चर्चा केली असली पाहिजे. इकडे अशी चर्चा होत असतानाच, राजाराम महाराजांच्या मृत्युची बातमी औरंगजेब बादशहाच्या छावणीमध्ये सुध्दा पोहचलेली होती. भक्ताजी

६. <u>पसेतुहिंस्वमो</u>.

७. <u>पसेतुहिंस्वमो</u>., पृ. २१४-२१६.

गायकवाड हुजरे, यांनी तो निरोप येसूबाई व शाहू महाराज यांना पोहचवला होता. तेव्हा ती दु:खद बातमी पोहचल्यावर शाहू महाराजानी भक्ताजीकडून राजारामाच्यादोन राण्या, ताराबाई आणि राजसबाई व रामचंद्र पंत यांना शाहू परत निरोप पाठवला. त्या निरोपाची माहिती मोडक खालीलप्रमाणे देतात--

"महाराजांनी भक्ताजी हुजरे यास सांगितले, की "उभयतां आई-साहेबांच्या पायांवर डोई ठेविली आहे. आणि उभयतां बंधूंस आशीर्वाद सांगावा" तसेच रामचंद्रपंतास निरोप पाठविला कीं "काकांच्या ठिकाणीं तुम्हीं असून काकासाहेबांच्या मागें आम्हांस नेण्याचा उद्योग करीत असालच. श्रीइच्छेने घडेल तो सुदीन. तथापि राज्य रक्षण करावें, श्रीकृपेः सुदीन प्राप्त होईल." हा निरोप पोचल्यावर रामचंद्रपंतास बहुत संतोष झाला. व नेत्रांतून उदक आलें."[८]

छत्रपतीच्या वारसाचा प्रश्न:

सिंहगडावर राजाराम महाराजांचे निधन झाल्यावरआवश्यक असे, सर्व धार्मिक विधी उरकल्यानंतर रामचंद्रपंतानी तेथेच राजारामाच्याप पश्चात छत्रपतीच्या गादीवर कोणाला बसवावयाचे व मोगलांच्या विरुद्ध लढा कसा चालू ठेवावयाचा याचा गंभीरपणे विचार केला. तात्काळ मराठा सरदारांना पत्रे पाठवली. राजाराम वारल्याचे त्यापूर्वी त्याने सर्वांना कळलेच होते. पण छत्रपतीपदाचा उत्तराधिकारी सर्वांच्या संमती शिवाय ठरवता येणे कठीण होते. म्हणून सर्व सरदारांना त्याबाबतीत विश्वासात घेणे आवश्यक होते. त्यासाठी राजाराम महाराजाच्या काळात लाभलेल्या मुखत्यारी[९] अधिकाराचा त्याने उपयोग करुन

---

८. मोडक,बा.प्र., उपरोक्त., पृ. १८.

९. गोखेराजाराम., पृ. ९३.

सर्व मराठा सरदारांचे मनोगत समजून घ्यावयाचा प्रयत्न केला.

राजारामाला एकूण चार बायका होत्या.[१०]

१. प्रतापराव गुजराची कन्या जानकीबाई-मुलगी सोयराबाई उर्फ सावित्रीबाई लग्न बजाजी निंबाळकर दुसरा.

२. ताराबाई (इ.स.१६७५ हंबीरराव मोहिते यांची कन्या, मुलगा शिवाजी, जिंजी येथे ज.ता.९-६-१६९६.

३. राजसबाई कागलकर घाटगे यांजकडील, मुलगा संभाजी, जन्म बहुधा पन्हाळ्यावर ता. २३-५-१६९७. रोजी.

४. अंबिकाबाई उ. अहल्याबाई.

या चार बायकांच्या पैकी जानकीबाई राजारामाच्या हयातीमध्येच मरण पावली होती. चौथील राणी अंबिकाबाई राजारामाच्या मृत्यूनंतर विशाळगडा-वर सतीगेली होती. तिला एक मुलगी झाली होती. परंतु ती लहानपणीच मारली होती. या परिस्थितीत दोन नंबरची राणी, ताराबाई ही जानकीबाई मरण पावल्यापासून राजारामाच्या हयातीतच पट्टराणी झालेली होती. त्यानंतर राजसबाई ही दोन नंबरची राणी म्हणून हयात होती. या दोन राण्यांना म्हणजे ताराबाई व राजसबाई, या दोघींना प्रत्येकी एक मुलगा होता. ताराबाई-चा मुलगा शिवाजी हा तारीख ९ जून १६९६ रोजी जिंजी येथे जन्मला होता. तर राजसबाईचा मुलगा पन्हाळा येथे तारीख २३ मे १६९८ रोजी जन्मला होता. म्हणजे राजारामाच्या या दोन मुलांच्या पैकी ताराबाईचा मुलगा ज्येष्ठ होता. परंपरेनुसार तोच बापाच्यानंतर वारसदार होणार होता. ताराबाई त्यावेळी

---

१०. उपरोक्त., पृ. ९०-९१.

२५ वर्षांची होती. राजसबाई ताराबाई पेक्षा दोन चार वर्षांनी लहान असाव्यात असे गर्गे यांचे म्हणणे आहे.[११] एकूण परिस्थितीचा विचार करता राजारामाच्या निधनानंतर ताराबाईचा मुलगाच छत्रपती पदाच्या अधिकाराचा वारस होता. अर्थात हा विचार केवळ राजाराम महाराज, हेच छत्रपती होते, असे समजून योग्य म्हणण्यास हरकत नाही. पण वस्तुस्थिती वेगळी होती. मुळात राजाराम महाराज हेच छत्रपती नव्हते. त्यांना परंपरेनुसार छत्रपती होण्याचा अधिकारही नव्हता. कारण शिवाजी राजाचे ज्येष्ठ चिरंजीव म्हणून संभाजी-राजे यांनी छत्रपतीपद मिळविले होते. त्या न्यायाने छत्रपतीपद संभाजी राजाचे चिरंजीव शिवाजी उर्फ शाहू यांच्याकडे जाणे आवश्यक होते. पण शाहू आणि त्याची आई येसूबाई यांना औरंगजेब बादशहाने कैद करुन आपल्या छावणीत ठेवले होते. तेव्हा छत्रपतीपदाचा कारभार चालणे आवश्यक असल्याने मराठा राजमंडळाने त्या जागी राजाराम महाराजाची नियुक्ती केली होती. पण तो अधिकार प्राप्त करत असताना राजाराम महाराजांनी स्वतःचा छत्रपती म्हणून राज्याभिषेक करुन घेतला नव्हता. राज्याभिषेक करुन घेण्याऐवजी त्यांनी केवळ मंचकारोहण केलेले होते. अशा परिस्थितीत राजाराम महाराजांच्या निधनानंतर खरा छत्रपती नियुक्त करणे गरजेचे होते. पण त्याही वेळी औरंगजेबाच्या कैदेतील शाहूची सुटका झालेली नव्हती. म्हणून गादीचा अधिकार चालू ठेवण्यासाठी मराठा राजमंडळाला, तो अधिकार राजारामाच्या मुलाला देणे आवश्यक झाले होते.

<u>राजा कर्ण:</u>

राजारामास ताराबाई पासून झालेला शिवाजी व राजसबाईपासून झालेला संभाजी, या दोन मुलांच्या खेरीज आणखीही एक मुलगा होता, असे इतिहास-

---

११. गर्गे,स.मा., <u>उपरोक्त</u>., पृ. ४५.

कारांनी पुराव्याच्या आधारे मांडलेले आहे. तो मुलगा म्हणजे राजा कर्ण.[१२] या कर्णाचा जन्म १६९१ मध्ये झाला होता आणि त्याच्या आईचे नाव सगुणाबाई असे होते. तिच्याशी राजाराम महाराजाचे रीतीरिवाजानुसार लग्न झालेले नसावे. पण तिच्यापासून जन्मलेल्या राजा कर्ण, या आपल्या पहिल्या मुलाचा जन्मोत्सव राजाराम महाराजानी मोठ्या आनंदात साजरा केला होता, असे दिसते. कारण या जन्मोत्सवामध्ये काम करणाऱ्या खंडोजी दाभाडे यास राजाराम महाराजानी पाच चावर जमीन बक्षिस दिल्याचा तारीख १ एप्रिल १६९१ मधील उल्लेख ता. ६ फेब्रुवारी १७०४ च्या एक चकनाम्यात आहे.[१३] राजारामाच्या मृत्यूनंतरचाच कर्णाला गादीवर बसविण्याचा प्रयत्न मराठ्याच्यातील काही सरदारांनी केला होता, असे सर जदुनाथ सरकार,[१४] रियासतकार सरदेसाई[१५] आणि ब्रिज किशोर[१६] अशा इतिहासकारांनी मान्य केले आहे. राजा कर्ण, हा देखणा, हुषार व बापाचा आवडता होता. पण तो अनौरस होता. तसेच त्याला गादीवर बसवण्यासाठी धनाजी जाधव व इतरांचाही पाठींबा होता. मोगल इतिहासकार खाफीखान यांने सुध्दा राजा कर्णाची माहिती दिलेली आहे. याच राजा कर्णाला जिंजीच्या वेढयात असताना राजाराम महाराजाने झुल्फिकारखानाच्या छावणीत बोलणी करण्याच्या प्रसंगाच्यावेळी पाठवलेले होते.[१७]

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

१२. अ) बेंद्रेराजाराम., पृ.१६९. ब) साने,का.ना.,संपा.मल्हार रामराव चिटणीस विरचित थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र,पुणे,तिसरी आवृत्ती,१९१५,पृ.४६. क) राजवाडे,वि.का.,उपरोक्त., खंड तिसरा, पृ. १७३-१७५.

१३. राजवाडे,वि.का.,उपरोक्त. खंड तिसरा., पृ. १७३-१७५.

१४. Sarkar, J.N., History of Aurangazib, Vol. V, M.C. Sarkar and Sons, Calcutta, 1924, p.135

१५. मराठीराजाराम., पृ. १०८.

१६. Brij, Kishore., op. cit., pp. 62 - 63

१७. बेंद्रेराजाराम., पृ. १६९-१७०.

राजाराम महाराज मरण पावल्यावर, राजा कर्ण त्याच्या गादीवर बसला होता, अशी माहिती फारसी साधन संग्रहात मिळते.[१८] साकी मुस्तैदखानाच्या मताप्रमाणे, राजारामाच्या मृत्यूनंतर कर्णाला गादीवर बसवले होते. पण तो लगेच म्हणजे काही दिवसातच मरण पावला.[१९] साकी मुस्तैदखानाने राजा कर्ण याचे नाव आपल्या पत्रात औरंगजेबाला कळवले नव्हते. पण पगडी यांच्या म्हणण्यानुसार मोगलांचा दुसरा इतिहासकार भीमसेन सक्सेना, याने मात्र त्याबाबतीत सविस्तर माहिती लिहिलेली आहे. राजारामाच्या मृत्युनंतर नेमके काय झाले, तसेच राजाराम कोणत्या आजाराने मरण पावला, याचीही माहिती भीमसेन सक्सेनाने जी दिलेली आहे ती पुढे पहा--

"बातमी आली की, राजारामाचा देवीच्या आजाराने मृत्यू झाला. त्याचा मोठा मुलगा कर्ण यास त्याच्या जागेवर बसविण्यात आले, पण थोड्याच कालात तोही आपल्या बापाच्यामागोमाग परलोकी निघून गेला. त्यानंतर रामाचा धाकटा मुलगा शिवाजी यास गादीवर बसविण्यात आले."[२०] तर हा राजा कर्ण गादीवर बसू नये या मताचे रामचंद्रपंत होते.[२१] कारण राजा कर्ण हा औरस पुत्र नव्हता. पण तो ज्येष्ठ होता आणि तोच गादीवर बसावा, अशी धनाजी जाधव आणि इतरांची इच्छा होती. म्हणून त्याला गादीवर बसवलेले होते. परंतु तो तीन आठवड्याच्या आतच मरण पावल्याने[२२] गादीच्या वारसाचा प्रश्न पुन्हा निर्माण झाला. होता. स्वाभाविकच, आता राजारामाचा दुसरा मुलगा शिवाजी, म्हणजे ताराबाईचा मुलगा याचाच गादीवर अधिकार होता. आणि त्याला गादीवर बसवण्याचे ताराबाईने निश्चित केले होते.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

१८. पगडी, सेतुमाधवराव., संपा. मराठे व औरंगजेब (मासिरे आलमगीरी, साकी मुसतैदखान), पुणे, १९६३, पृ.८६.

१९. उपरोक्त.

२०. पगडी., सेतुमाधवराव., संपा. मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा, भीमसेन सक्सेना), पुणे, १९६३, पृ. १४४-१४५.

२१. Brij, Kishore., op. cit., p. 53

२२. Ibid.

रामचंद्रपंताची छत्रपतीच्या वारसा संबंधीची भूमिका:

मल्हार रामराव चिटणीस लिखित "थोरले शाहू महाराज यांचे चरित्र" यामध्ये लिहिले आहे, की राजाराम महाराज "जालनापूर मारून सिंहगडी येऊन शके १६२१ फाल्गुन मासी (२ मार्च १७००) वारले. शके १६२३ राजशक २८, यानंतर संभाजी राजे राजसबाईचे पुत्र बसवून नऊ वर्षापर्यंत राज्य चालविले."[२३] यातील राजाराम महाराजांच्या संबंधीचा मजकूर बरोबर आहे. पण संभाजी राजे राजसबाईचे पुत्र गादीवर बसविले हा मजकूर चुकीचा आहे. राजाराम महाराज वारल्यानंतर राजा कर्ण गादीवर आला होता. पण तो देवीच्या रोगाने दिनांक २४ मार्च १७०० रोजी मरण पावला.[२४] त्यामुळे मराठा राज्याला वारस नेमण्याचा प्रश्न अनिर्णयीतच राहिलेला होता. राजाराम मरण पावला तेव्हा मुख्य प्रधान होते आणि रामचंद्रपंत "हुकूमतपन्हा" आणि "अमात्य" असे होते. त्यांच्यातील गैरसमज औरंगजेबाच्यामुळे जे निर्माण झालेले होते, ते संपलेले होते. दोघांनीही एकत्रपणे मराठा राज्याच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली होती. राजाराम मरण पावल्याची बातमी औरंगजेबाच्या कैदेतील शाहूला कळवण्यात आल्यानंतर शाहूकडून भवताजी हुजरे यांच्याकडीने रामचंद्रपंतावर संपूर्ण विश्वास दाखवला होता. त्यामुळे रामचंद्रपंताच्या पुढे छत्रपतीच्या गादीचा वारस नेमके कोणाला करावे, असा प्रश्न होता. परंपरेनुसार ती गादी कैदेत असलेल्या शाहू महाराजास मिळणे अपरिहार्य होते. पण ते कैदेत असल्याने, तसे करता येणे अशक्य होते. या परिस्थितीत ताराबाईंनी स्वत:चा मुलगा, जो राजारामाच्या दोन मुलांपैकी ज्येष्ठ होता, त्या शिवाजीला गादीवर बसविण्याचा आग्रह धरला. शिवाजी त्यावेळी पूर्ण चार वर्षाचा पुरता झालेला नव्हता. शिवाय

---

२३. मल्हार रामराव चिटणीसकृत., छत्रपती शाहू महाराजांची बखर., पृ.६.

२४. Brij, Kishore, op. cit., p. 63

क्षत्रियांच्या रीतीरिवाजानुसार मुंज होणे पुढता आवश्यक होते. पण त्यावेळी मोगलांच्या कैदेत असलेला संभाजीचा मुलगा शाहू हा वीस वर्षांचा झाला होता, तरीही त्याची मुंज झालेली नव्हती. आणि एकाच कुटुंबातील मुलांच्या मुंजी करताना, सामान्यत: वडिल मुलाची मुंज केल्यानंतर धाकट्या मुलाची मुंज करावी, असा प्रघात आहे. पण तो प्रघात किंवा ती प्रथा मोडून आपल्याच मुलाची मुंज करावी, असा आग्रह ताराबाईने धरला होता. मुंज केल्यानंतर त्याला सत्तारूढ करण्याचे तीचे धोरण होते. मुंजीशिवाय तत्कालीन रूढी प्रमाणे शिवाजीला म्हणजे ताराबाईच्या मुलाला सत्तारूढ करता येणे शक्य नव्हते. म्हणून तीने स्वत: होऊन, आपल्या मुलाची मुंज करून घेण्याविषयी रामचंद्रपंताकडे आग्रह धरला. बखरीतील तत्कालीन वर्णन[२५] आणि त्यावेळच्या परिस्थितीचे इतिहासकारानी[२६] केलेले विश्लेषण लक्षात घेता, हे स्पष्ट होते की रामचंद्रपंत ताराबाईच्या शिवाजीची मुंज करावयाला बिलकूल तयार नव्हते. त्यांचा त्यावेळी औरंगजेबाच्या कैदेत असलेल्या शाहू महाराजाकडे ओढा होता. पण परिस्थितीने त्यांना साथ द्यावी, असे वातावरण नव्हते. परिणामी रामचंद्रपंताची ममलूत ताराबाईच्यावतीने परशुराम-त्र्यंबक व नारो शंकर यानी काढली.[२७] त्यावर पंत कसे वागले याचे वर्णन बखरीत पुढीलप्रमाणे आहे--

"धनी म्हणतील तसा रुकार लावयाचा मी नव्हे। तुमच्या मर्जीस आल्यास लक्ष प्रकारे करावे, मी काही नको म्हणत नाही."[२८] असे बोलोन निघोन घरास गेले. आईसाहेब यांनी सांगितले की "पंताचे घरी जाऊन पंतांचा राग

---

२५. हेरवाडकर, र. वि., उपरोक्त., राजाराम., पृ.७०-७१.

२६. अ) गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ.४६. ब) मोडक, बा.प्र., उपरोक्त., ११.
    क) पगडी राजाराम., पृ.१०७.

२७. अ) मोडक, बा.प्र., उपरोक्त., ११ ब) हेरवाडकर, र. वि., उपरोक्त-राजाराम., पृ.७१.

२८. हेरवाडकर, र. वि., उपरोक्त-राजाराम., पृ.७१.

शांत करून, रूकार घेऊन उद्योग करावा." म्हणोन परशरामपंत व शंकराजीपंत यांस आज्ञा केली. त्यावरून जाऊन उभयतांनीं मर्जी पाहून विनंती केली की, "आपण बराखुद (स्वत:) धणीपणा करीत आला, तसाच महाराज धनी चालवित गेले, परंतु आईसाहेबांची मर्जी एक त-हेची, आपण रूकार दिला पाहिजे." हे ऐकूण पंत बोलिले कीं, "कल्याणप्रद असेल ते करावें." त्यावरून उभयतांनी जाऊन आईसाहेबांस विनंती केली. नंतर मुर्जीचा निश्चय करून समारंभ जाहालियेवरि पन्हाले मुक्कामी सिंहासनारूढ झाले."[२९]

रामचंद्रपंताचा शिवाजीच्या अंचकारोहणास मनापासून पाठिंबा नव्हता. मोगलांच्या कैदेतील शाहू महाराजांना सोडवूनआणण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्या त-हेने त्यांने सिंहगडाहून पन्हाळगडाला येण्यापूर्वी प्रयत्नही केला होता. पण त्या प्रयत्नाला यश आले नव्हते. आणि त्याच्या त्या गुप्त प्रयत्नाची किंवा योजनेची बातमी ताराबाईला समजली असावी. म्हणूनच ती त्याच्यावर नाराज होती. पण तशाही परिस्थितीत ताराबाईला उघडपणे ती नाराजी व्यक्त करता येण्यासारखी नव्हती. राजारामाच्या पश्चात रामचंद्र पंतालाच छत्रपतीच्या ठिकाणी मानून सर्व सरदारांनी मोगलांच्या विरूध्द एकदिलाने लढा चालू ठेवला होता. तेव्हा त्या परिस्थितीत, बखरीच्या आधारे सरदेसाई यांनी सांगितले आहे की ताराबाईचे म्हणणे मान्य करून, रामचंद्रपंताने तिचा मुलगा शिवाजी याची मुंज करण्यास व त्याचा राज्याभिषेक करण्यास संमती दिली. सन १७०१ मध्ये पन्हाळा येथे शिवाजीचा राज्याभिषेक झाला.[30] याशिवाय पूर्वीचेच अष्टप्रधान-मंडळ कायम करण्यात आले. मात्र प्रतिनिधी पद सगापंते यांच्याकडून काढून घेऊन ते परशुराम त्र्यंबक याच्याकडे देण्यात आले.[३१] ताराबाईने रामचंद्रपंताचा सल्ला न मानता रामचंद्रपंतावर जबरदस्ती करून आपले मनोरथ ज्या मार्गाने पूर्ण करून घेतले ते इतिहासकार सरदेसाई यांना मान्य नाही. म्हणूनच त्यांनी ताराबाईच्या

---

२९. उपरोक्त.,
३०. मराठी रियासत.,भाग २.,पृ.६८७.
३१. उपरोक्त.

त्या भूमिकेविषयी आपले मत खालील प्रमाणे मांडले आहे--

"राजारामाचे मृत्यूसमयी शत्रू दाराशी आ करून बसलेला व शाहू कैदेत. अशा प्रसंगी दूरदर्शीपणाने पुढचा विचार करण्याचे सोडून, ताराबाई स्वार्थाने वागूं लागली. रामचंद्र पंतासारख्या वाकबगार मुत्सद्याच्या सल्ल्याचा अव्हेर करून, तिने शिवाजीस राज्याभिषेक करविला. परशुरामपंतास आपले हाता-खालीं घेऊन, तिने रामचंद्रपंताचे मन दुखविलें. रामचंद्रपंताने मात्र तीस कधी दगा दिला नाहीं. भांडण करण्यापेक्षां तिच्याच अनुरोधानें चालणें बरें, असे समजून तो तिचा कारभार हांकित होता. सारांश, थोरल्या शिवाजी महाराजांनीं सर्व गोष्टी राष्ट्राकरितां करावयाच्या, असा जो उदात्त कित्ता घालून दिला होता, तो इतःपर एकीकडे राहून, राज्यामध्ये दुही माजत चालली. तेणेंकरून राष्ट्राचें मोठे नुकसान झाले."[32]

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर राजा कर्ण सत्तेवरआला होता. त्यानंतर तो देवीच्या रोगाने मरण पावल्यावर ताराबाईचा मुलगा शिवाजी सत्तेवर आल्याची माहिती आहे. पण मराठी साधनांच्यामध्ये ब्रिजकिशोर म्हणतात त्याप्रमाणे राजा कर्ण सत्तेवर आल्याची माहिती नाही.[33] ताराबाईचा मुलगा शिवाजीच सत्तेवर आल्याचे मराठी साधनात आहे. बेंद्रे यांनी या विषयीची माहिती देताना स्पष्ट केले आहे, की मराठी साधनात "राज्याभिषेक" हा शब्द जो वापरला आहे तो समान अर्थाने घेतला पाहिजे. कारण हिंदू शास्त्राप्रमाणे अशौचाच्या काळात त्यावेळी शिवाजी होता. म्हणजे वयाने लहान होता. म्हणून त्याचा त्या वयात तसा विधी होऊ शकत नव्हता. तसेच दुसरे असे की

=-=-= =-=-=-=-=-= =-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३२. उपरोक्त., पृ.६८८.

33. Brij, Kishore., op. cit., p. 63

शिवाजी महाराजांनी विधीपूर्वक थाटलेले सिंहगड येथील सिंहासन मोगलांनी लुटलेले होते. आणि त्यानंतर नवीन सिंहासन विधीपूर्वक निर्माणच केलेले नव्हते. तेव्हा ताराबाईच्या शिवाजीचे मंचकारोहणच झाले होते, असे म्हणणे योग्य आहे. हा मंचकारोहण बेंद्रे यांच्यामते तारीख १० मार्च १७०० रोजी वर्ष प्रतिपदेच्या मुहुर्तावर परंतु पित्याच्या अशौचाच्या नववे दिवशी छत्रपती म्हणून घोषित केले होते.[३४] करवीर रियासतकार स.मा. गर्गे यांनी मात्र शिवाजीची मुंज आणि राज्याभिषेक इ.स. १७०० च्या मे-जून महिन्यात पन्हाळगड येथे झाला असावा, असे म्हटले आहे. पुढे हेही स्पष्ट केले आहे की "त्यासंबंधी निश्चित तारीख उपलब्ध नाही."[३५] तत्कालीन फारसी इतिहासकाराची माहिती मान्य करून गर्गे यांनी पुढे सांगितले आहे की, "बातमी आली की रामाचा (राजाराम) देवीच्या आजाराने मृत्यू झाला (२ मार्च १७००). त्याचा मोठा मुलगा कर्ण याला त्याच्या जागेवर बसविण्यात आले, पण थोड्याच काळात तोही आपल्या बापाच्या पाठोपाठ परलोकी निघून गेला. त्यानंतर रामाचा (राजाराम) धाकटा मुलगा शिवाजी याला गादीवर बसविण्यात आले. राजारामाचा मुख्य प्रधान रामचंद्र (रामचंद्रपंत अमात्य) हा होता. त्याने खेळण्याच्या (विशाळगड) किल्ल्यात शिवाजीला ठेवले आणि तो त्या बालराजाने रक्षण व संगोपन करु लागला. सर्व मराठे सरदार त्याच्या आज्ञेत होते आणि त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागत होते."३६

शिवाजीचा राज्याभिषेक पन्हाळ्यावरच:
---

रामचंद्रपंत अशी भूमिका बाजवत होते. याविषयी बहुतेक इतिहासकारांचे मत आहे. परंतु हा प्रकार शिवाजीच्या राज्यारोहणासंबंधीचा आहे. अर्थात शिवाजीचा राज्याभिषेक गिरजोजी यादवांच्या पत्रानुसार विशाळगडावर झाला

---

३४. बेंद्रे राजाराम., पृ.४१०-४११.
३५. गर्गे., स.मा., उपरोक्त., पृ.४५-४७. ३६ अ) उपरोक्त
३६ ब) पसेतुप्रोम., पृ.१४४.

होता, असे म्हटले आहे.[३७] आणि ह्या आधारावर जयसिंगराव पवार यांनी "महाराणी ताराबाई" या आपल्या ग्रंथात गिरजोजी यादवाच्या पत्राचा उल्लेख करुन शिवाजीचा राज्याभिषेक, "सोहळा विशाळगडावरच सन १७०१ मध्ये पार पडला असावा."[३८] असा निष्कर्ष काढला आहे. तथापि हा निष्कर्ष पवारांनी नेमका कसा काढला आहे, ते स्पष्ट केलेले नाही. पुढे त्यांनी मल्हार रामराव चिटणीसाचा आधार घेण्याचा प्रयत्न केला आहे. चिटणीसाच्या लिखाणाप्रमाणे, "राज्याभिषेक २८, शके शालिवाहन १६२३ वृषा संवत्सर शुद्ध दसने मधा अल्लफ शिवाजी महाराजांस राज्याभिषेक जाहला."[३९] चिटणीसाचे हेच मत पवारांच्या अगोदर अनेक इतिहासकारांनी ग्राह्य मानलेले आहे. त्यामध्ये सरदेसाई हे सुध्दा आहेत.[४०] पण सरदेसाईंनी हा राज्याभिषेक पन्हाळगडावर झाल्याचे मराठी रियासत भाग २ मध्ये पृ ६८७ वर सांगितलेले आहे. सरदेसाईंनी अशा त-हेने शिवाजीचा राज्याभिषेक जेथे झाला, अशी पन्हाळगड व विशाळगड अशी दोन वेगवेगळी स्थळे सांगितली आहेत. आणि स्वतःच गोंधळ करुन घेतला आहे. शिवाजीचा राज्याभिषेक पन्हाळा का विशाळगड येथे झाला, याचा निर्णय सरदेसाईंनी केला नाही आणि तीच अवस्था जयसिंगराव पवारांची सुध्दा झालेली आहे. स.मा.गर्गे यांनी सुध्दा असाच प्रकार केलेला आहे. तेही म्हणतात-- "मंजीचा निश्चय करुन समारंभ झालियावरी पन्हाळे मुक्कामी सिंहासनारुढ झाले."[४१] गर्गेंचा हा आधार म्हणजे चिटणीस बखर आहे.[४२] तेव्हा चिटणीस बखरीची शहनिशा न करता, गर्गे हे सुध्दा सरदेसाई यांच्याप्रमाणे "सनदापत्रे" पुस्तकाच्या पृ.१०४ वरील वाक्य " शिवाजीराजे यांनी विक्रम संवत्सरी विशाळगडी राज्यासनारुढ झाले. ताराबाईसाहेब राज्य कारभार चालवित."[४३] या आधारे

---

३७. पवार,आप्पासाहेब.,संपा.उपरोक्त.,पत्र १४३,पृ.१९९.
३८. पवार,ज.भा.,उपरोक्त.,पृ.९४.
३९. हेरवाडकर,र.वि.,उपरोक्त-राजाराम.,पृ.७१.
४०. उपरोक्तराजाराम.,पृ.११८.
४१. गर्गे,स.मा.,उपरोक्त.,पृ.४६.
४२. हेरवाडकर,र.वि.,उपरोक्त.,पृ.१२४.
४३. गर्गे,स.मा.,उपरोक्त.,पृ.४७.

शिवाजीचा राज्याभिषेक विशाळगड येथे झाला असे म्हणतात. म्हणजे गर्गे यांनी सुध्दा शिवाजीचा राज्याभिषेक किंवा मंचकारोहण पन्हाळगड का विशाळगड येथे झाला होता याचा निर्णय केलेला नाही. मराठ्यांच्या इतिहासातील ही एक महत्त्वाची बाब असून, अजूनही त्यासंबंधी निर्णय न होता दुर्लक्षित राहिलेली आहे.

तथापि शिवाजीचा राज्याभिषेक किंवा मंचकारोहण पन्हाळगड येथेच झाले असले पाहिजे, असा निष्कर्ष काढला तर वावगे होणार नाही. कारण राजाराम महाराज सिंहगडावर मरण पावले, तेव्हा औरंगजेबाच्या मोगल सैन्याने साता-यापर्यंत कुच केलेले होते. साता-याला वेढा दिलेला होता. आणि औरंगजेब साता-याच्याजवळ दक्षिणेला छावणी ठोकून साता-यावरील मोहिमेची देखरेख करीत होता.[४४] याचा अर्थ असा की मोगलांनी सातारच्या बाजूला सर्व लक्ष केंद्रीत केलेले होते.

दुसरी बाब असी की राजाराम महाराज मरण पावले, तेव्हा मागेच सांगितल्याप्रमाणे ताराबाई [व राजसबाई] या त्याच्या दोन राण्या पन्हाळगडावर राहत होत्या. त्या पन्हाळगडावर राहात असतानाच रामचंद्रपंताने राजाराम महाराजांचे सर्व अंत्यविधी सिंहगडावर उरकल्यानंतर पन्हाळा येथे येऊन त्या दोन राण्यांना राजारामाच्या मृत्यूची हकीकत सांगितली होती व त्या दोघींचे सांत्वन केले होते. रामचंद्रपंत पन्हाळ्यावर त्या दोन राण्यांना भेटण्यास आल्याचे व त्या भेटीतच त्या राण्या आणि रामचंद्रपंत यांच्यामध्ये स्वराज्याचा वारस नेमण्याचा विषय चर्चिला गेल्याचे सरदेसाई यांनी सुध्दा मान्य केले आहे.[४५] ऐवढेच नव्हे तर त्या भेटीमध्ये

---

४४. <u>बेंद्रे राजाराम</u>., पृ. ३१७.

४५. [illegible] राजाराम., पृ. १०७.

रामचंद्रपंताने प्रथम ताराबाईचा पुत्र शिवाजी याच्या राज्यारोहणास विरोध दर्शविल्याचे व नंतर त्यास मान्यता दिल्याचेही सरदेसाईंनी स्पष्टपणे मांडले आहे.[४६] याचाच अर्थ असा की सरदेसाई, वारसासंबंधीच्या कलहाचीच तेवढी चर्चा देतात. पण शिवाजीचे राज्यारोहण नेमके कोठे झाले, याविषयी निश्चितपणे सांगत नाहीत. आणि असे असतानाही ते पुढे सांगतात की, "सन १७०१ च्या आरंभी पन्हाळगडास त्याचा (बादशाहाच्या सैन्याचा) वेढा बसला, पण तो गड हाती पडण्यास पांच महिने लागले, म्हणून विशाळगडची मोहीम इ. स. १७०२ साली झाली."[४७] अशा त-हेने ताराबाई पुत्र शिवाजी याचा राज्याभिषेक किंवा राज्यारोहण पन्हाळगड व विशाळगड या दोन ठिकाणां-पैकी एका ठिकाणी, म्हणजे तर जो निष्कर्ष काढला आहे त्यानुसार पन्हाळगड येथेच झाला होता, असे मान्य करणे फारसे वावगे होण्यासारखे नाही. कारण तो काल राजधानीच्या निवडीच्या वादाचा किंवा निवडीविषयीचा नव्हता, तर छत्रपतीपदाच्या वारसाच्या निवडीसंबंधीचा होता. म्हणून रामचंद्रपंताची त्या बाबतीत नेमकी भूमिका काय होती; हे समजून घेणे महत्त्वाचे होते. त्यानुसार आता पर्यंत जेवढी साधनसामुग्री व पुरावे वापरण्यात आले, त्यावरून हेच स्पष्ट होते आहे, की राजारामाच्या निधनानंतर गादीचा वारस म्हणून औरंगजेबाच्या कैदेत असलेल्या शाहूला सोडवून आणण्याची त्याची इच्छा होती. परंतु ते शक्य होण्यासारखे नव्हते. मग त्या परिस्थितीचे भान ठेवून त्याने ताराबाईंना मुलगा शिवाजी याची मुंजही पुढे ढकलण्याचा प्रयत्न केला. पण ताराबाईच्या हट्टी स्वभावापुढे त्याचे काही चालू शकले नाही. शिवाय धनाजी जाधवासारखे सेनापती सुध्दा

४६. उपरोक्त., पृ. १०७-१०८.

४७. उपरोक्त., पृ. १०९.

ताराबाईच्या बाजूला गेलेले होते. तेव्हा परिस्थितीचा अंदाज घेऊन मराठ्यां-च्यातील फूट टाळण्याच्या हेतूने त्याने इतर सरदारांप्रमाणे शेवटी ताराबाईपुत्र शिवाजी याची मुंज करण्यास व त्याचे राज्यारोहण करण्यास संमती दिली आणि मोगलाच्या विरूदचा मराठयांचा लढा अधिक जोमदार व यशस्वी करण्यासाठी आपले कार्य पूर्ववत धोरणानुसार चालू ठेवले.

राम्चंद्रपंताचे इ.स. १७०० ते १७०७ पर्यंतचे कार्य:

राजारामाच्या निधनानंतर त्याची पट्टराणी ताराबाई हीने आपला मुलगा शिवाजी याचा राज्याभिषेक जबरदस्तीने करवून घेतला. पण तो शिवाजी त्यावेळी केवळ ४ वर्षांचा मुध्दा झालेला नव्हता. याशिवाय ताराबाईने आपल्या मुलाचे नाव पुढे करुन सर्व कारभार आपल्या हाती घेतला. नवेमंत्रिमंडळ जाहीर केले. त्यामध्ये रामचंद्रपंताच्याकडे पूर्वीप्रमाणेच अमात्यपद ठेवण्यात आले. धनाजी जाधवाला सेनापती पद दिले. परशुराम त्र्यंबकला प्रतिनिधी व शंकराजी नारायण यांना सचिव केले. अनुभव आणि वयाच्या ज्येष्ठतेनुसार छत्रपतीला मार्गदर्शन करण्याचा रामचंद्रपंताला सर्वात जास्त अधिकार होता. पण त्याने शिवाजीच्या राज्याभिषेकाला प्रथमत: विरोध केल्याने, त्याला अमात्य पद दिले असले तरी ताराबाईला तो आपल्या पूर्ण मर्जीतला आहे, असे वाटत नव्हते. किंबहुना रामचंद्रपंत राजनीतीमध्ये अधिक हुषार, धोरणी व तीव्र स्वाभिमानी असल्याने त्यांना न दुखवता त्यांच्याकडून जे मार्गदर्शन मिळेल तेवढयावरच, समाधान मानून स्वत:च्या तंत्राने राज्यकारभार करण्याचा ताराबाईचा इरादा होता, असे अनुमान निघते. अर्थात ताराबाईच्या अशा वागण्याचा व धोरणाचा विचार न करता सर्वच इतिहासकारांनी असे मांडले आहे की, "रामचंद्रपंत यांजकडे कुल अख्त्यार होता,

परंतु ते ताराबाईच्या आग्रही स्वभावामुळे पूर्वीप्रमाणे वाटून काम न करिता जिलक्याच तितके करू लागले."[४८]

ताराबाई व रामचंद्रपंत यांच्यात त्यावेळी संबंध दुरावलेले होते. रामचंद्रपंताने छत्रपतीचा वारस म्हणून औरंगजेबाच्या कैदेत असलेला शाहू याचा नावाचा उल्लेख न करता ताराबाईच्या शिवाजीला वारस ठरवण्याची भूमिका घेतली असती तर तो ताराबाईलाही आपल्या मताप्रमाणे वागवू शकला असता. ताराबाई त्यावेळी २५ वर्षांची होती. तिने आपला पती राजाराम हयात असतांना काही वेळा राज्यकारभारात लक्ष घातले होते. पण केवळ तेवढ्या अनुभवावर ती त्यावेळी मराठा राज्य संरक्षण करायला समर्थ होती, असे म्हणणे धाडसाचे होईल. पवार[४९] या इतरांनी रामचंद्रपंताला सत्तापिपासू आणि स्वार्थी ठरवण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो रास्त वाटत नाही. पवारांनी रामचंद्रपंताने ताराबाईला विरोध करण्याची जी दोन कारणे दिलेली आहेत, त्यामध्ये वर उल्लेख केल्याप्रमाणे पंताचा ओढा शाहूकडे होता हे एक, व दुसरे, म्हणजे असे की पंतानी राजारामाच्या कारकीर्दीत महाराष्ट्रात सर्वाधिकारी म्हणून अमर्याद सत्ता उपभोगली होती, ती त्यांना सोडावयाची नव्हती; हे होय. हा मुद्दा जेव्हा मांडला जातो, तेव्हा हेही लक्षात ठेवले पाहिजे की तो काळ मराठा राजमंडळातील प्रमुखांनी आपसात भांडण्याचा काळ नव्हता. कारण औरंगजेबासारखा बलाढ्य शत्रू पाठीवरच होता. हे संकट ओळखूनच जरी परंपरा व हिंदू कायदा हे संभाजीचा मुलगा शाहू, यालाच वारस ठरविणार होते; तरी त्याकडे दुर्लक्ष करून मराठ्यांची एकी टिकविण्यासाठी व स्वराज्य सांभाळण्यासाठी ताराबाईच्या दुराग्रही भूमिकेला सुद्धा पाठिंबा दिला होता. खरे तर पंताच्या या भूमिकेची वाखाणणीच होणे आवश्यक आहे.

---

४८. पोद्दार,बा.प्र., उपरोक्त.,पृ.१९.

४९. पवार,ज.भा.,उपरोक्त.,पृ.९७.

औरंगजेबाविरूध्दचा सामना:

शिवाजीला पुढे करून ताराबाईनी सत्ता हाती घेतल्यावर मराठ्यांच्या पुढे सर्वांत महत्त्वाचे काम होते औरंगजेबाला यशस्वीपणे तोंड देण्याचे. आणि त्यावेळी रामचंद्रपंतानी आपली "हुकूमतपन्हा" व "अमात्य" पदाची भूमिका जर योग्यरित्या पार पाडली नसती तर कदाचित दुसरा इतिहास सुध्दा घडला असता. पण रामचंद्रपंत स्वामिनिष्ठ आणि देशाभिमानी होते. त्यामुळेच त्यानी प्रथम मोगलांचे संकट नष्ट करण्यासाठी पूर्वीप्रमाणे कार्य चालू ठेवले. त्यावेळी गोरे म्हणतात त्याप्रमाणे "मराठ्यांकडे एक धनी कैदेत, एक धनी मृत्यू पावलेला, राजपुत्र अज्ञान, लोक दु:खी असून, सैन्य, द्रव्य, युध्दसामग्री ही जेमतेम बाताबोताची होती."[50] याउलट औरंगजेबाचे सामर्थ्य फार प्रचंड होते आणि राजाराम महाराज मरण पावल्याने, तो दुप्पट उत्साहाने मराठ्यांना नष्ठ करण्याच्या तयारीला लागलेला होता. या कठीण परिस्थितीत रामचंद्रपंताने सर्व सरदारांना वेगवेगळ्या ठिकाणी नेमून शत्रूचा मुकाबला यशस्वीपणे करण्याच्या योजना आखल्या. त्यापूर्वी ताराबाईने औरंगजेब बादशाहाकडे वकील पाठवून तह करण्याचा प्रयत्न केला होता. पण बादशाहाने त्या तहाच्या अटी मान्य केल्या नव्हत्या. त्यामुळे मोगल मराठे संघर्ष चालूच राहिला होता.

साताराचा किल्ला सर केल्यावर औरंगजेब बादशाहाने पन्हाळ्याकडे दृष्टी वळविली. कारण त्यावेळी ताराबाई आणि मराठा राजमंडळातील काही प्रमुख लोक तेथे होते. औरंगजेब मिरज मार्गे पन्हाळ्याच्या जवळ ९ मार्च १७०० रोजी आला.[५१] आणि तो तेथे २९ मे १७०१ पर्यंत होता.[५२] त्यानंतर तो ब्रम्हपुरीला गेला. पुन्हा डिसेंबर ६,१७०१ रोजी ब्रम्हपुरीहून गाजापूर येथे जाऊन पोहोचला. तारीख १६ जानेवारी १७०२ रोजी औरंगजेबाने स्वत: विशाळगडाजवळ एक मैलावर तळ ठोकला व विशाळगडाची मोहिम सुरू केली.

---

५०. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ.५१.

५१. पसेतुहिस्वमो., पृ. २२६.

५२. उपरोक्त., पृ. २२७.

अशा रितीने एकीकडे प्रत्यक्ष मोगल बादशहा औरंगजेब मराठ्यांच्या छत्रपतीच्या धराण्यातील लोकांना व प्रमुखांना चिरडून टाकण्यासाठी प्रयत्न करीत होता, तर दुसरी कडे त्याचे काही महत्त्वाचे सरदार महाराष्ट्रातील इतर भागात मराठ्यांचा बिमोड करण्याच्या उद्योगाला लागलेले होते. तो काळ म्हणजे अत्यंत धामधुमीचा आणि जीवन मरणाचा, असा होता. त्याकाळात भीमसेन सक्सेना यांने सांगितल्याप्रमाणे ताराबाईने विलक्षण चातुर्य आणि धाडस दाखवून मराठ्यांचे नेतृत्व केले आणि मोगलांच्या विरुध्दचे मराठ्यांचे सामर्थ्य वृध्दींगत केले.[५३]

औरंगजेबाचा मोर्चा पन्हाळगडाकडे वळला, तेव्हा रामचंद्रपंत व दादो मल्हार कोकणात व्यवस्था पाहत होते. त्यांनी ४ फेब्रुवारी १७०१ रोजी जंजि-याचा सिद्दी याकुत याच्याबरोबर यशस्वी लढाई दिली. त्यानंतर रामचंद्रपंत पन्हाळ्याकडे आला. पन्हाळ्याकडे रामचंद्रपंतानी रसद पाठवयाचा निकराने प्रयत्न केला. पण मोगलांचा सरदार नस्रतजंग यानी ती रसद १७०१ मध्येच लुटली व अनेक मराठा सैनिक ठार मारले. तरीही २४ फेब्रुवारी रोजी रामचंद्रपंत यांनी पन्हाळ्यात प्रवेश मिळविला. पन्हाळा कोणत्याही परिस्थितीत हातचा जाण्यासारखा नव्हता. पण पन्हाळ्याचा किल्लेदार त्र्यंबक विठ्ठल महाडकर यांने ५० हजार लाच खावून तो किल्ला मोगलांच्या हावाली केला. तेव्हा रामचंद्रपंताने त्र्यंबक विठ्ठलला द्रोह केल्याबद्दल विशाळगड येथे कैदेत टाकले.[५५]

पुढे मोगलांनी विशाळगडाला वेढा घातला होता. औरंगजेब स्वत: त्या ठिकाणी आला होता. मराठ्यांच्यावतीने रामचंद्रपंताने विशाळगड लढविण्याची जबाबदारी परशुराम त्र्यंबक याच्यावर सोपविली होती. पण मोगलांच्या उलट किल्ला लढवणे अशाक्य झाल्याने, परशुरामापंताने तो किल्ला मोगलांना दिला.[५६]

---

५३. उपरोक्त., पृ१ २४९.

५४. Brij,Kishore.,op.cit.,p.73.

५५. Ibid.p.74.

५६. अ) SJNAUB.,Vol.V,p.186.

ब) Brij,Kishore.,op.cit.,p.75.

## राजकुटुंबाचे संरक्षण:

अर्थात पन्हाळा आणि विशाळगड मोगलांनी जिंकले होते, तरी त्यांची परिस्थिती दिवसे दिवस खराब होत चालली होती. विशाळगड जेव्हा ताब्यात दिला, तेव्हा पावसाळा तोंडावर होता. त्यामुळे औरंगजेब विशाळगडची मोहिम उरकल्यावर पन्हाळ्याचे येथे १७ जुलै १७०२ रोजी आला. तेथून पुढे पूर्वेकडे कृष्णानदी ओलांडून भीमा नदीच्या किनारी नोव्हेंबर १७०२ मध्ये पोहचला.[५७] पन्हाळ्याकडे आपली मोहिम अशी चालू असतानाच रामचंद्रपंताने पुण्याकडे धनाजी जाधव आणि बाळाजी विश्वनाथ भट आदींच्यावर कामगिरी सोपवली होती. रामचंद्रपंताने मोगलांच्या उलट लढताना मराठ्यांच्या ताब्यातील सर्व किल्ल्यांचा योग्य बंदोबस्त व्हावा म्हणून योग्य उपाय योजना केलेली होती. तसेच राजकुटुंबाच्या अंतर्गत संरक्षणाची जबाबदारी स्वत:वर घेतली होती. रामचंद्रपंताने ही कामगिरी कशा प्रकारे पार पाडली, ती मोरे यांनी पुढील प्रमाणे दिली आहे--

"रामचंद्रपंताने दरएक किल्ल्यास वेढा पडण्यापूर्वी लोक, दारूगोळा, धान्य व इतर सामग्री यांची जमी करून किल्ला फार दिवस लढेल अशी तजवीज राखिली होती. किल्ला लढत असतां सवड मिळेल तेथें त्यास मदत पोंचवीत असे, आणि वेढा घालणाऱ्या फौजेस बाहेरून उपद्रव पोंचेल अशी तजवीज राखीत असे. मोगलांच्या फौजेचे हालचालीवर नेहमीं नजर राखी. त्यानें आपली हालचाल गुप्त राहणेची तजवीज ठेविली होती. राजकुटुंबाच्या राहण्याच्या ठिकाणाची बातमी शत्रूस लागूं नये म्हणून तो त्यांचे स्थान वारंवार बदलीत होता."[५८]

## ताराबाईकडून रामचंद्र पन्तास वतने:

याप्रमाणे रामचंद्रपंत जेव्हढे शक्य होईल, तेव्हढे स्वराज्याच्या संरक्षणासाठी

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

५७. Brij, Kishore., op. cit., pp. 75 - 76.

५८. मोरे, रा.म., उपरोक्त., पृ.५९.

कार्य करीत होता. सर्व सरदार कोकणच्या भागात नेमलेले होते. अर्थात ताराबाईने जरी तिचा मुलगा शिवाजी याला छत्रपती होण्यास रामचंद्र पन्ताने सहजासहजी परवानगी दिली नव्हती, तरी तो वाद जास्त न वाढवता रामचंद्रपंताकडून महत्त्वाची कामे करून घेण्याचे कौशाल्यपूर्णरित्या चालूच ठेवले होते. म्हणूनच तिने रामचंद्रपंताच्या नेतृत्वाखाली २० हजार लष्कर देऊन त्याला प्रथम कोकणात सिधीच्या विरुध्द पाठवले होते. कान्होजी आंग्रे या मोहिमेचा प्रमुख होता. त्यामुळे सिद्दीचा इलाज चालला नाही.[५९] कान्होजी आंग्रेनी तर इंग्रजांचा मुलुख बिघाड केला. ताराबाई आणि रामचंद्र पंत अशा त-हेने संघटित राहूनच मोगलांच्या बरोबर मुकाबला करीत होते. याचा परिणाम म्हणूनच रामचंद्र-पंताला शिवाजीच्या राज्याभिषेकानंतर पहिले वतन तारीख ८ जुलै १७०१ मध्ये दिलेले आहे.[६०] त्यानंतर तारीख २१ ऑगष्ट १७०३ मध्ये महिमत गडाजवळचे गाव मुरादपूर हे मुद्दाम रामचंद्रपंताला इनाम म्हणून दिलेले आहे.[६१] तिसरे इनाम मार्च १७०४ मध्ये दिल्याचेही इनामपत्र उपलब्ध आहे.[६२] रामचंद्रपंत आणि ताराबाई यांचा बेबनाव झाल्याचे इतिहासकारांनी मांडले आहे तरी, शिवाजी च्यावतीने ताराबाईने रामचंद्रपंताला खूष करण्यासाठी आणि आपल्या पक्षात ठेवण्यासाठी कोकणची वतने देण्याचे हुकूम केलेले होते. या धोरणानुसारच तारीख १ फेब्रुवारी १७०४ मध्ये शिवाजी महाराजाच्या आज्ञेने जंजिरे सिंधुदुर्ग येथील सबनीसी रामचंद्रपंताना वंशपरंपराने दिलेली होती.[६३] आणि पुढे तशा प्रकारे पत्रही मे १७०४ मध्ये शिवाजी छत्रपतीने पाठवले होते.[६४] वर यावरून हेच स्पष्ट होते की रामचंद्रपंत आणि ताराबाई एका दिलाने काम करीत होते आणि पंताच्यावर जी जी कामगिरी सोपविली जात होती, ती कामगिरी पंत

==-=-=-==-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-= =-=-=-=-=-=-=-=-=-=

५९. पवार, जयसिंगराव, उपरोक्त., पृ.२४४-२४५.
६०. सबनीस, के.गो., उपरोक्त., पृ.९९.
६१. उपरोक्त., पृ.१००.
६२. उपरोक्त., पृ.१०१.
६३. उपरोक्त., पृ.१०८-१०९.
६४. उपरोक्त., पृ.१०९.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यशस्वीरीत्या पार पाडत होते. म्हणूनच त्यांच्या कार्याचे चीज होण्याखाली शिवाजीने म्हणजे ताराबाईनेच पंतांना निरनिराळी वतने देऊन खुष ठेवले होते.

राचंद्रपन्ताची जागरूकता व मोगलांची पिछेहाट:

पंत आणि ताराबाई यांच्यामध्ये अमरकार आणि सरदेसाई [६५] यांनी गैरसमज असल्याचे दाखवले असले, तरी रामचंद्रपंतांनी मोगलांच्या उलट लढत असताना कोठे कसूर केलेली आहे, असे कोठे म्हटलेले नाही. उलट बादशहाचे सैन्य प्रचंड असताना सुध्दा त्यालाच पुढे पुढे अपयश येत गेले. आहे. रामचंद्रपंत तशा काळात गाफील राहिला असता किंवा आपले कर्तव्य करताना त्यांने ताराबाईला सहकार्य केले नसते तर मराठा राजमंडळ आणि मराठा सरदार यांच्यावर त्याचा वाईट परिणाम झाला असता. पण असे घडले नसल्याने व औरंगजेब आणि त्याच्या प्रचंड सैन्याचीच दानादान उडाली असल्याने, रामचंद्रपंताचे कार्य प्रामाणिकपणे चालू होते; असेच म्हणावे लागेल. याबाबतीत गोरे म्हणतात तसे बादशहा उत्तरेकडेचे किल्ले जिंकून दक्षिणेकडे जात असताना उत्तरेकडचे किल्ले परत घेण्याची योजना रामचंद्रपंताने आखली होती. ती योजना परशुराम त्र्यंबक, शंकराजी नारायण व स्वत: रामचंद्रपंत यांनी यशस्वीपणे पार पाडली आणि त्याचाच एक भाग म्हणून इ.स. १७०५ मध्ये रामचंद्रपंताने पन्हाळा व पावनगड हे किल्ले जिंकून मोगलांचे बत्तीस शिराळा येथील जे ठाणे होते, ते ठाणे सुध्दा जिंकून घेतले होते. रामचंद्रपंताच्या अशा यशामुळे व कर्तृत्वामुळे मोगल मराठा लढाईतील यशाचे पारडे मराठ्यांच्या बाजूला कले आणि रामचंद्रपंताने "पन्हाळा" हे मराठ्यांच्या राजधानीचे ठिकाण केले.[६६]

---

६५. SGSNHM., p. 371.

६६. गोरे,रा.म.,उपरोक्त.,पृ.६०.

रामचंद्रपंताच्या धोरणामुळे आणि विजयामुळे बादशाहाच्या छावणीत दिवसेंदिवस निराशा पसरत गेली. या उलट ताराबाईला आनंदच होत गेलेला आहे. या बाबतीत अ.ना. भागवत लिहितात, "पन्हाळा पंतांनी जिंकून घेतला हे वर्तमान ताराबाईस कळतांच तिला फार आनंद झाला. ती लागलींच आपल्या चिरंजीवासह पन्हाळ्यास येऊन राहिली, आणि तेंव तिनें त्या वेळेपासून आपले राहण्याचे मुख्य ठिकाण केले. (इ.स.१७०५). ही कामगिरी पंतांनी मोठी नामी केल्यामुळे ताराबाईचा त्यांच्यावरचा रोष पुष्कळ कमी होऊन राज्यकारभारांतही त्यांची सल्लामसलत ती मग जास्त घेऊं लागली व थोडेसा त्यांच्या तंत्रानेही चालू लागली. पंतानीं पन्हाळा, व पावनगड हे किल्ले घेतल्याबरोबर शंकराजी नारायण यांनीं ही संधी साधून सिंहगड पुन्हा काबीज केला. सिंहगड, पन्हाळा आणि पावनगड हे किल्ले मराठे सरदारांनी पुन्हा हल्ले करुन घेतल्याची बातमी औरंगजेबास तो वाकिन खेड्याहून परत फिरला तेंव्हा कळली. हे किल्ले आपल्या ताब्यातून गेले, याचे त्याला फार वाईट वाटले."[६७]

मराठ्यांच्या गोटात अशी चढाईची तयारी चालू असतानाच औरंगजेबाच्या गोटात निराशेचे वातावरण पसरु लागले होते. एकतर मराठा सैन्याचे पुढे एक एक किल्ला लढवता लढवता त्याचे सैन्य बेजार झाले होते आणि दुसरे,मोगलांनी जे किल्ले मराठ्यांच्याकडून राजारामाच्या काळात जिंकले होते त्यातील बरेच व महत्त्वाचे किल्ले मराठ्यांनी परत मिळविले होते. इ.स.१७०३ मध्ये औरंगजेबाच्या आदेशानुसार झुल्फिकारखानाने सिंहगड घेतलेला होता. पण त्यावेळी मोगलांचा प्रभाव असलेल्या दक्षिणेकडील मिरज आदी भागात मराठ्यांनी धुमाकूळ घातलेला होता. तेव्हा मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने झुल्फिकारखानाची नगर

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६७. भागवत,अ.ना., उपरोक्त., पृ.२०७.

भागातून तिकडे रवानगी केली. पण त्याच वेळी त्याची स्वत:ची प्रकृती अत्यंत खालावलेली होती. त्याचा काल जवळ आला आहे अशी चर्चा मोगलांच्या गोटात होत होती.[६८] स्वाभाविकच मराठ्यांच्या विरुध्द लढण्यासाठी मोगल सैन्यामध्ये उत्साह राहिलेला नव्हता. तथापि मराठ्यांच्या विरुध्दचे युध्द चालू ठेवण्याची जिद्द औरंगजेबाने टिकवलेली होती. त्यासाठी तो तशाही वृध्द अवस्थेत प्रयत्नशील होता.[६९] १७०६ मध्ये औरंगजेबाची मन:स्थिती कशी शोचनीय होती व बहादूरगडाहून औरंगजेब ता. २० जानेवारी १७०६ रोजी औरंगाबादला कसा पोहोचला तसेच वाटेत मराठा सैन्याने त्याला कसा त्रास दिला याची माहिती भीमसेन सक्सेना यांनी दिलेली आहे.[७०] मराठ्यांनी औरंगजेबाला महाराष्ट्रात जसा त्रास दिला तसा त्याच्या गुजराथमधील प्रदेशालाही त्रास दिला होता. धनाजी जाधवाने गुजराथवर हल्ला करुन मोगलाई सैन्याचे पारिपत्य केले होते. गुजराथमध्ये धनाजी जाधव अशा त-हेने काम करीत असतानाच मराठे सरदार खुद्द बादशहाच्या छावणीवर हल्ला करत होते. तसेच १७०६ चा पावसाळा संपल्यावर मराठ्यांनी विजापूर प्रांतावही आक्रमणे केली.[७१] या सर्व परिस्थितीत रामचंद्रपंतानी अत्यंत नेकीने आपले कर्तव्य पार पाडले आहे. मराठ्यांचे स्वराज्य कोणत्याही परिस्थितीत टिकले पाहिजे, हीच त्याची भूमिका होती. म्हणून पंताच्या या वागण्याचे मूल्यमापन गोरे यांनी पुढील प्रमाणे केले आहे--

"रामचंद्रपंताने शिवाजीच्या युध्दपध्दतीचा स्वीकार करुन मुत्सद्दीपणाची योजना, सावधगिरी व धिमेपणाने वागणे, या योगाने स्वत: बादशहावर व जाधव, घोरपडे इत्यादि सेनापतींकडून झुल्फिकारखानावर एकसारखी नजर राखून मराठ्यांच्या पूर्ण नाशाकरितां सुरु झालेली लढाई ७/८ वर्षे सारखी चालवून जेरीस आणून शोकास नेली, आणि मराठ्यांचे राज्य व नाव राखून त्यांचा

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६८. पसेतुहिंस्वमो.,पृ.२७४.
६९. सगोपराजाराम.,पृ.१४५-१४७.
७०. पसेतुहिंस्वमो.,पृ.२८०.
७१. उपरोक्त.,पृ.२८९.

... दोहोंकडे दरारा बसविला. बादशहा पूर्वी मराठयांस डोंगरांतील उंदीर म्हणत होता. आणि प्रथम वास्तविक तशी स्थिती होतीही, परंतु मराठयांनी क्रमाक्रमाने आपणास "सिंह" या पदास आणिले.[७२]

रामचंद्रपंत, मराठा-राजमंडळ आणि ताराबाई अशा त-हेने ऐकोप्याने राहून स्वराज्याचे रक्षण करीत होते. इ.स. १७०० ते १७०७ पर्यंत त्यांच्यातही एकमेकांच्या विरुध्द गैरसमज निर्माण झाले होते. कलह पुध्दा माजले होते. पण त्या सर्वांच्यावर मात करुन मराठयांनी एकमुखाने औरंगजेब व त्याच्या अमर्याद मोगल सत्तेला शह दिला. मराठयांच्या दृष्टीने तो अत्यंत श्रेष्ठ कर्तृत्वाचा काल होता. रामचंद्रपंताने त्या सर्व कालात अत्यंत संयम राखून, ऐवढेच नव्हे तर, प्रसंगी अपमान सहन करुनही मराठयांची एकी कायम टेवण्यासाठी आटोनात कष्ट घेतले होते. त्याच्या अशा कामगिरीमुळे, स्वेच ताराबाई व मराठा-राजमंडळातील प्रमुखांच्या अशाच प्रकारच्या वागण्याने तथा रामचंद्र पंताच्या मार्गदर्शनाने मोगलांना पराभवाच्या वाटेवर पोहचविले होते. औरंगजेब आणि मोगल सैन्य अशा रीतीने पराभवाच्या खाईत लोटले असतानाच, अहमदनगर येथे औरंगजेबाचा दिनांक २० फेब्रुवारी १७०७ रोजी मृत्यू झाला.[७३] औरंगजेब हारला, मराठे जिंकले. आणि मराठयांच्या या विजयात रामचंद्रपंतानी "हुकूमतपन्हा" व "अमात्य" या नात्याने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली व तपेच भरीव स्वरुपाने कामगिरी केले.

.....

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

७२. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ६१-६२.

७३. परेतुहिंव्कमो., पृ. २९.

## - प्रकरण ६ -

## औरंगजेबाच्या मृत्यूनंतरचे रामचंद्रपंताचे धोरण आणि कार्य

औरंगजेबाच्या मृत्यूने मराठा राज्यावरील फार मोठे संकट टळल्यासारखे झाले होते. पण संपूर्ण संकट संपले होते, असे म्हणणे बरोबर होणार नाही. कारण महाराष्ट्रातील मोगलांचे सरदार अजून लढतच होते. शिवाय शाहू महाराज त्यांच्या कैदेत होता. फक्त एक गोष्ट औरंगजेबाच्या मृत्यूने स्पष्ट झाली होती, ती म्हणजे ही की मराठ्यांच्या विरुध्द त्याच्या सारखा, जिद्दीने लढणारा दुसरा कोणी मोगलांच्याकडे नव्हता. तरीही मराठ्यांच्या गोटात त्याच्या मृत्यूने गुंतागुंतीची एक वेगळीच परिस्थिती निर्माण केली होती. तो मरण पावल्याने शाहू त्याच्या कैदेतून सुटेल अशी आशा निर्माण झाली होती. मराठा सरदारांनी शाहूच्या सुटके-नंतर ताराबाईच्या बाजूला का शाहूच्या बाजूला जावे, असा प्रश्न निर्माण झाला होता. रामचंद्रपंताच्या पुढे सुध्दा हा प्रश्न होताच. शिवाय ते स्वत: धर्मपरंपरा आणि हिंदुशास्त्र कायदा मानणारे असल्याने, त्यानी छत्रपतीच्या गादीवर शाहूचाच हक्क मानला होता. अर्थात रामचंद्रपंतानी हा मुद्दा राजारामाच्या मृत्यूनंतरच उपस्थित केला होता. व शेवटी आपला मुद्दा सोडून देऊन त्यांनी ताराबाईचा पक्ष धरला होता. तसेच औरंगजेब जोपर्यंत मराठ्यांच्या विरुध्द लढत होता, तो पर्यंत त्यांच्या त्या भूमिकेत बदल झालेला नव्हता. म्हणूनच त्यांनी औरंगजेबाविरुध्दचा लढा अधिका-अधिक तीव्र करुन यश मिळविण्याचे प्रयत्न केले. शाहूच्या सुटकेचे चिन्ह दिसू लागताच पंताची भूमिका काय राहिल, हे समजून घेण्यासाठी ताराबाई व इतर मराठा सरदार यांच्यामध्ये औत्सुक्य होते. तशा अर्थाने तो केवळ

रामचंद्रपंत यांच्या दृष्टीनेच नव्हे, तर इतर मराठा सरदारांच्या दृष्टीने सुध्दा कसोटीचा काळ होता. कारण शाहू महाराज मोगलांच्या कैदेतून सुटून गेल्याचे महाराष्ट्रात मराठ्यांच्यापुढे दोन धनी उभे रहाणार होते. एक ताराबाईचा मुलगा शिवाजी आणि दुसरा संभाजीचा शाहू. परंपरा आणि हिंदू रीवाज या प्रमाणे शाहू जरी छत्रपती पदाचा उत्तराधिकारी होता, तरी तो मोगलांच्या कैदेत इ.स. १६८९ ते इ.स. १७०७ या दिर्घ काळात राहिल्याने त्याच्या पश्चात मराठा राज्य ज्यांनी चालवले, त्या राजारामाच्या मुलाचा म्हणजे शिवाजीचा अधिकार सुध्दा प्रस्थापित झाल्यासारखेच होते. म्हणूनच या दोन धन्यापैकी कोणाची निवड करावी, असा प्रश्न अनेकांच्या समोर होता.

तोतया शाहू:
----------

अर्थात औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची मोगलांच्या कैदेतून सुटका होण्यापूर्वी, त्याच्या नावाचा एक तोतया महाराष्ट्रात निर्माण झाला होता. या तोतयाची माहिती चिटणीस बखरीत पुढीलप्रमाणे आहे--

"शाहू महाराज देशीं येई तों पर्यंत सात वर्षे (ताराबाई कारभार) चालवित असतां शाहू महाराज म्हणोन तोतया देशांत उत्पन्न झाला. हे कळोन लोक पाठविले. पादशाहाचे सैन्यांत (शाहू) असतां हा तोतया, याची चौकशी करुन, धरुन आणिला. नव्हेसा ठरला. तेव्हों मारुन टाकिला."[१]

शाहूच्या गैर हजरीत आणि ताराबाईने तिचा मुलगा शिवाजी याच्या नावे कारभार सुरु केल्यावर दोन तोतये शाहूच्या नावाने महाराष्ट्रात निर्माण झाल्याचे सांगितले आहे. पहिला तोतया पन्हाळगडच्या परिसरात,

---

१. साने, का.न., संपा. उपरोक्त., पृ. ८९.

तर दुसरा सुधागडच्या परिसरात निर्माण झाला होता. या दोन्ही तोतयांचा अस्सलपणा उघडकीला आणण्यासाठी ताराबाई आणि मराठा सरदारांना अकारण ताकद खर्च करावी लागली होती. पहिला तोतया खटावचा कुलकर्णी, खंडो लिंगो हा होता. याने पन्हाळगडाच्या परिसरात शाहू म्हणून आपले स्वरूप प्रगट केले. त्याने रामचंद्रपंतांचा आधार घ्यायचा प्रयत्न केला. पण रामचंद्रपंतांनी सत्य लक्षात येताच, त्याला झिडकारून लावले आणि तो तोतया मोडून काढला.[२] दुसरा तोतया इ.स.१७०० मध्ये राजारामाच्या मृत्यूनंतर निर्माण झाला होता. पण त्यालाही त्याचवेळी संपवलेले होते.[३] पहिल्या तोतया पेक्षा दुसऱ्या तोतयाने थोडी खळबळ माजवलेली होती. त्यामुळे शाहू महाराज औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांच्या कैदेतून सुटून येण्याच्या वेळी सुध्दा तो शाहू, तोतया आहे की खरा शाहू आहे, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक होते. तेव्हा त्या शाहूची खरीखुरी माहिती मिळवणे गरजेचे होते. तसेच तो खरा ठरला, तर पुढे नेमके धोरण काय स्वीकारायचे, याविषयी सर्वच मराठा सरदारांच्या पुढे प्रश्न चिन्ह होते. रामचंद्र पंत यावेळी मराठा राज्याचे जुने जाणकार व कर्तृत्ववान मार्गदर्शक होते. त्यांचा दरारा सुध्दा संपूर्ण मराठा राज्यात पसरलेला होता. विशेषत: औरंगजेबाच्या मृत्यूनंतर रामचंद्रपंत हेच ताराबाईच्या सल्ल्याने मराठा राज्य रक्षण करतील याचीखात्री मराठी माणसांना झालेली होती. तेव्हा ते शाहू महाराजाविषयी कोणती भूमिका स्वीकारतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले होते.

औरंगजेब मरण पावल्यावर:

औरंगजेब मरण पावल्यावर त्याच्या जागी त्याचा मुलगा शाहजादा

---

२. पवार, आप्पासाहेब., उपरोक्त., पृ. ४८०.

३. मावजी, पु. वि., व पारसनीस, द. ब., } संपा. उपरोक्त-सनदापत्रे, पुणे, १९०९, पृ.१८४-१८५.

आज्जम याने अहमदनगर येथे स्वत:ला बादशाहा म्हणून जाहीर केले होते.[४] त्यानंतर औरंगजेबाच्या अंतीम इच्छेनुसार त्याचा खुलदाबाद येथे दोन दिवसांनी दफन विधी केला. आणि नंतर तो झुल्फिकारखानाच्या समवेत उत्तरेकडे रवाना झाला. आणि मोगल सैन्य अशा रीतीने दिल्लीकडे वाटचाल करीत असताना बखरीत सांगितल्याप्रमाणे आणि जदुनाथ सरकारसह अनेक इतिहासकारांनी मान्य केल्याप्रमाणे मोगलांची अशी वाटचाल उत्तरेकडे होत असताना त्यांच्या कैदेतील शाहू महाराजाने मराठ्यांच्याकडे खलिता पाठवून आपण महाराष्ट्रात येणार असल्याचे कळविले.[५] औरंगजेबाने मृत्यूपूर्वी शाहूची देखरेखीची जबाबदारी त्याची मुलगी बेगम झन्नतउनीसा हिच्यावर सोपविलेली होती. तिने शाहूच्या सर्व संरक्षणाची जबाबदारी स्वत:वर घेतलेली होती.[६] त्यामुळे शाहू निर्धास्तपणे उत्तरेकडे चालला असला, तरी तो उत्तरेकडे जात असतानाच त्याला कैदेतून सोडण्याविषयी खलबते सुरु झालेली होती. खाफीखानाने सुध्दा याविषयी स्पष्टपणे माहिती दिलेली आहे. त्याच्या मताप्रमाणे झुल्फिकार-खान याचे शिवाजीचा नातू शाहू याच्याबरोबर प्रेमाचे संबंध होते आणि त्याने ब-याच दिवसापूर्वीपासून शाहूच्या प्रकरणात लक्ष घातले होते. आणि त्याच्या सल्ल्यानुसार आज्जम खानाने शाहू आणि त्याच्याबरोबरच ५०-६० लोक सोडून दिले. त्या सोडलेल्या लोकांमध्ये मोहनसिंह नांवाचा सुलतानपूर व नंदुरबार अशा काही ठिकाणचा मोठा बलखोर जमीनदार सुध्दा सोडलेला होता. त्या जमीनदाराने शाहूला युध्द सामुग्रीसह आवश्यक ती मदत दिली होती. त्यानंतर शाहू नंदुरबारमार्गे पुढे महाराष्ट्रात आला. प्रसिध्द इतिहासकार व्ही.ए. स्मिथ यांनी शाहू बहादूरशाहाच्या कैदेत होता, असे जे म्हटले आहे, ते बरोबर नाही.[७] आज्जम शहाने दिल्लीकडे जाताना त्यास झुल्फिकारखानाच्या सल्ल्याने सोडले व तो मे १७०७ मध्ये नर्मदा नदीच्या उत्तरेला नेमावर गावाजवळच्या दोराह या ठिकाणी मुक्त होऊन महाराष्ट्रात आला.[८] महाराष्ट्रात येण्यापूर्वी त्याने आपण येत असल्याची खबर ताराबाई

---

४. पसेतुहिंस्वमो., प.. २९१.

५. चिटणीस, गोविंद खंडेराव., श्री शाहू महाराज यांची बखर, प१.२५-२६.

६. SGSNHM., Vol.I., p. 365

७. Smith, V.A., The Oxfered History of India, Delhi,1958,p.453

व इतर मराठ्यांना कळवल्याचे दिसते. कारण नर्मदा नदी ओलांडून तो अलिकडे महाराष्ट्रात येताना त्याने पत्र पाठवल्याचा बखरीत उल्लेख आहे. बखरीतील तो उल्लेख असा--

"यानंतर गंगा उतरून अलिकडे आले आणि ताराबाईसाहेब व त्यांचे पुत्र शिवाजी राजे, प्रधान, व अमात्य रामचंद्रपंत वगैरे मुत्सद्दी, सचीव, चिटणीस यास पत्रे पाठविली जे, "आम्ही पातशाहापासून निघोन मुक्कामावर येऊन पावलो. नोकरच येतो."[९]

मोगलांच्या कैदेतून सुटल्यावर आपणा सत्ता मिळावी, अशी इच्छा शाहू महाराजाना होणे स्वाभाविक होते. त्यानुसार त्यांनी मराठा सरदारांना पत्रे पाठवली असतील, यात शंका नाही. अशा पत्रांपैकी एक पत्र डॉ. आप्पासाहेब पवार यांनी प्रसिद्ध केले आहे. ते पत्र शंकराजी यादव यांना लिहिलेले असून पुढील प्रमाणे आहे--

"स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित नाम संवत्सरे कार्तीक बहुल त्रयोदसी भामवासरे क्षेत्रीय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री संकराजी यादव यास आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावोन लेखनार्थ विदित जाला व गोपाळपंत पाठविले ते व सरंजामाची यादस्त व रा। नागोजी बाबाजी यास पत्र पाठविले ते व जिनस स्वामीस दाखविले. यादही पाहिली व कितेक मुखोगते सांगितले तेही विदित जाले. तरी तुम्ही कदीम स्वामीचे येकिनष्ट सेवक. स्वामीस तुमचे ऊर्जित करावे हे

---

८ Sharma, S.R., Mughal Empire In India, Lakshmi Narain Agarawal Educational Publisher, Agra, Sixth Ed., 1974, p. 362

९. पारसनीस,दब., संपा. श्री शाहूमहाराज यांची बखर, सातारा, भारतवर्ष, पु..२रे, पृ. १३

आगत्य आहे· तरी तुम्ही आपले जमावनिसी सत्वर दर्शनास येणे· यादी-प्रमाणे सरंजामाच्या सनदा करून धावयाचा निश्चये रा नागोपंतासी केला आहे· त्याप्रमाणे स्वामी करून देत आहेत· तरी दिरगावरी न घालणे· तुम्हास सिरपाव वस्त्र मंदील १ येक पाठविले आहे ते घेणे· बहुत अविलंबे स्वार होऊन येणे· जाणिजे·
छ २६ साबान·

मर्या
देयं रा
जते·"[१०]

शाहूच्या सुटकेसंबंधी ताराबाईची भूमिका:

शाहू महाराजाची सुटका होऊन ते महाराष्ट्रात येणार असल्याची खबर जाहीर होताच, "मराठा राजमंडळ" आणि महाराष्ट्रात मोठी खळबळ माजली· शाहूने त्यावेळी प्रथमत: आपण कैदेतून सुटल्याची खबर ताराबाई व शिवाजी यांना कळविली होती; आणि त्याच प्रमाणे त्याने ती खबर रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी, सचीव, चिटणीस वगैरे मुत्सद्यांना सुद्धा कळविली होती· तेव्हा ती पत्रे पाहून सर्वजन आपाआपल्या ठिकाणी चकित झाले होते·[११] तसे होणेही अपरिहार्य होते· "राजमंडळात" अशा त-हेने आश्चर्य पसरले असतानाच ताराबाईने, तिला शाहूचे जे पत्र आले होते, ते आल्यावर, राजमंडळातील सर्वांना विश्वासात घेऊन आपल्याच मुलाच्या नावाने म्हणजे शिवाजीच्या नावानेच गादी चालवण्याचा प्रयत्न चालविला· त्यासाठी तिने "रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्र्यंबक, शंकराजी नारायण, निळकंठ मोरेश्वर प्रधान, धनाजी जाधव सेनापती वगैरे सरदार व मुत्सद्दी

---

१०·पवार, आप्पासाहेब·, उपरोक्त·, पृ· २५९-२६०·
११· भागवत,अ·ना·, उपरोक्त·, पृ· २१६-२१७·

यास दरबारात बोलावून सांगितले कीं, तुम्हा सर्वावर इतराजी करून संभाजीराजे यांनी अपराध नसतां शिक्षा केल्या, आणि सर्व राज्य व दौलत गमावली. त्यानंतर राजाराम महाराज यांनी पुढे चंदीस जाऊन तुम्हा सर्वांस वाढवून तुमच्या सहाय्यानें राज्य सोडविले. यास्तव त्यांचे पुत्र शिवाजी राजे यास अंतर न देतां फौज घेऊन जाऊन प्रस्तुतचे शाहूराजे खरे असोत, किंवा खोटे असोत, त्याशी लढून त्यांस धरावें ऐशी मसलत करून शपथ करावी म्हणून तिनें शपथा घेतल्या."[१२] ताराबाईने इतर सरदाराप्रमाणे रामचंद्र पंताकडूनही एकनिष्ठतेची शपथ घेतलेली होती. तथापि त्या सर्व सरदारांच्यामध्ये रामचंद्र पंतांचेच महत्त्व जास्त होते. ते जर ताराबाईला त्यावेळी अनुकूल राहिले नसते, तर परिस्थिती बदलली असती. तेव्हा रामचंद्रपंतांचे असे महत्त्व लक्षात घेऊनच सरदेसाईनी सुध्दा रामचंद्र पंताच्या या शपथेचा उल्लेख पुढील प्रमाणे केला आहे--

"शाहू महाराज दिल्लीहून आले ते समयी त्यांस अनुकूल न व्हावें म्हणोन मातुश्री ताराबाईनीं रामचंद्रपंताजवळ शपथ घेवविली, शाहू महाराज सातार्‍यास राहिले, मातुश्री पन्हाळ्यास राहिली."[१३]

अशा रीतीने ताराबाई आणि तिचा मुलगा शिवाजी यांच्याशी एकनिष्ठ राहाण्याच्या शपथा बहुतेक मराठा सरदारांनी घेतल्या होत्या, पण धनाजी जाधव आणि खंडो बल्लाळ यांनी तशा शपथा घेतल्या नव्हत्या असे सरदेसाईचे मत आहे. त्यांनी त्या दोघांचे म्हणणे स्पष्ट करताना सांगितले आहे, की औरंगजेबाच्या म्हणजे मोगलांच्या कैदेतून सुटलेला शाहू, जर तोतया किंवा खोटा असेल तर त्याला मारु आणि खरा असेल तर त्याच्याशी लढणार नाही. सरदेसाईनी धनाजी आणि खंडो बल्लाळ यांच्या तोंडी घातलेले शब्द बखरीतले असून ते पुढील प्रमाणे आहेत--

---

१२. उपरोक्त., पृ. २१७.

१३. सरदेसाई, गो.स., हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास मराठी रियासत ५, पुण्यश्लोक शाहू, पेशवा बाळाजी विश्वनाथ (१७०७-१७२०), मुंबई, १९४२, पृ. ४३.

"खोटा असला तर अवश्य लढून मारु, पण खरा असला तर आपण त्याशी लढणार नाही."[१४]

## रामचंद्रपन्त व ताराबाई संघर्ष:

ताराबाई आणि "राजमंडळ" यांच्या मध्ये अशा त-हेने शाहू आल्यावर त्याच्याशी कसा मुकाबला करावयाचा, याच्या योजना चालू असतानाच रामचंद्रपंताची अवस्था द्विधा झाली होती. कारण त्यानी राजाराम महाराजांच्या इच्छेप्रमाणे शाहू महाराजांची कैदेतून सुटका करण्याची जबाबदारी स्वीकारलेली होती. राजाराम महाराजाना मृत्यूसमयी जे वचन त्यांनी दिलेले होते, ते पाळणे त्याचे कर्तव्य होते. परंतु त्यांच्याकडून आणि इतरांच्याकडून ताराबाईने जबरदस्तीने बेलभांडार हाती देऊन एकनिष्ठतेची शपथ घ्यायला लावली होती.[१५] ताराबाईने अशा रीतीने मराठा राजमंडळाला आपल्या बाजूला घेऊन आपला मुलगा शिवाजी हाच छत्रपतीच्या गादीचा, कसा कायदेशीर वारसदार आहे, हे पटवून दिले होते. त्या संदर्भात तिने सैतवडेकर देसाई यांना पाठवलेल्या पत्रात आपली भूमिका पुढील प्रमाणे व्यक्त केली आहे--

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित्स. अश्विन शु. तृतीया, सौम्यवासरे, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांनी सोमनाईक देसाई व देश कुलकर्णी ता. सैतवडे यांसी आज्ञा केली ऐसीजे: राजश्री: शाहूराजे तामृाचे निर्बंधातून निघाले आहेत, म्हणून हुजूर वर्तमान आले. ऐशास, हे राज्य थोरल्या के. स्वामींनी बहुतश्रमे मेळऊन, स्वार्थी संपूर्ण केले होते. ते

---

१४. वटणीस, गो. ह., उपरोक्त., पृ. २७.

१५. Brij, Kishore., op. cit., pp. 103 - 105.

राजश्री संभाजीराजे काका यानी विध्वंसून कैलासवासी स्वामी (राजाराम महाराज) राज्याधिकारी झाले. त्यांनी स्वपराक्रमे नूतनच राज्य संपादिले. स्वामींनी त्याचे संरक्षण करून ताम्रांचा पराभव केला. राज्याची अभिवृध्दी होत चालली. दुसरी गोष्टी. हे राज्य थोरल्या कै. स्वामीनी तीर्थस्व कै. स्वामीस (राजाराम महाराजांस) द्यावेसे केले होते. ऐसे असता त्यांस (शाहू महाराजांस) या राज्याशी संबंध नाही. त्या होहणीगात जे मिळाले आहेत व मिळतील त्यास नतीजा पावावयाची आज्ञा करून, रा. जयसिंग जाधवराव सेनापती व हंबीरराव मोहिते सरलष्कर व वरकड सरदारांस फौजेनिशी पाठविले आहेत. रा. परशराम पंडित प्रतिनिधी यांसही रवाना केले आहे. त्याचें अनुसंधान त्यांकडे लागले असेल त्यांचा हे मुलाहिजा होणार नाही, शासन करितील. तुम्ही वतनदार एकनिष्ठ आहा. तुम्हां-पासून अनसारखी (इतरासारखी) वर्तणूक होणार नाही; परंतु शाहूराजे याजकडील कागदपत्र तुम्हास आले असता काही वर्तमान हुजूर लिहिले नाही, म्हणाजे काय ? त्यांकडून माणूस आले तेच कैद करून पाठवावयाचे होते. ते गोष्ट न केली यामध्ये बरे काय विचारिले आहे ! याउपरि ऐसे करीत न जाणे. त्यांकडील कागदपत्र घेऊन माणूस येईल ते कैद करून हुजूर पाठवीत जाणे. कदाचित कोणही त्यांकडे अनुसंधान लावील, राबता राखेल, तरी त्याचा उबार राहणार नाही. तुम्ही अनसारखा प्रसंग मनात आणाल, कागदपत्र येईल तो पन्हाम कराल, तरी तुमचे बरे होणार नाही. वतनापासून दूर व्हाल हे जाणोन स्वामींच्या पायांशी निष्ठा धरून राहोन लिहिलेप्रमाणे वर्तणूक करणे. जाणिजे. मर्यादेयं विराजते. लेखनसीमा. सुरु सूदबार"[१६] (१७ सप्टें., १७०७).

---

१६. अ) सरदेसाई, गो. स., मराठी रियासत मध्यविभाग १ (इ.स. १७०७ ते १७४०) गणेश महादेव आणि कंपनी, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९२५, पृ. ५.

ब) गर्गे, स. मा., उपरोक्त., पृ. ६२.

या पत्राच्या आधारे ताराबाईला हे सूचित करावयाचे होते, की जे स्वराज्य अस्तित्वात होते, ते राजाराम महाराजांच्यामुळे अस्तित्वात होते. शिवाजी महाराजानी मिळवलेले स्वराज्य संपलेले होते. तेव्हा जे स्वराज्य राजाराम महाराजांच्यामुळे टिकले होते, त्या स्वराज्याचा उत्तराधिकारी राजाराम महाराजांचा ज्येष्ठ मूलगाच झाला पाहिजे. त्या स्वराज्यावर शाहू महाराजाचा कसलाही हक्क नाही. ताराबाईच्या या भूमिकेला रामचंद्रपंताने तसा सरळ सरळ विरोध केलेला नाही. त्याचा शाहू संबंधीच्या हक्काचा विचार हा व्यक्तीगत नव्हता. कारण राजाराम महाराजानीच तसे स्वांना मरतेसमयी सांगितले होते. शिवाय राजाराम महाराजांचा राज्याभिषेकही झालेला नव्हता. पंताच्या भूमिकेचे गोरे यानी अशाच प्रकारे स्पष्टीकरण दिलेले आहे.[१७]

शाहूला मोगलांची सनद:

राजारामाच्या काळात राजारामाने औरंगजेबाकडे काही शाहींच्या द्वारे शाहूची सुटका करावी, अशी विनंती केलेली होती[१८] परंतु औरंगजेबाने ती विनंती धुडकाऊन लावली होती. आता मात्र परिस्थिती वेगळी होती. औरंगजेब मेलेला होता, तरीही मोगलांना मराठ्यांच्या विरुध्दचे युध्द चालूच ठेवावयाचे होते. आणि त्याच वेळी झुल्फिकारखानाच्या मदतीने आज्जमशहाला दिल्लीची गादी बळकावयाची होती. त्यामुळे झुल्फिकारखानाचा सल्ला महत्त्वाचा होता. शिवाय मराठे शाहूच्या सुटकेने विभागले गेले तर आपआपसात भांडत बसतील व त्यामुळे मोगलांना उपद्रव होणार नव्हता असा झुल्फिकारखानाचा सल्ला होता. म्हणून खालील अटीवर शाहूची सुटका करण्यात आली.

---

१७. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ५५.

१८. Kincaid and Parasnis., A History of the Maratha People Vol. II, S. Chand, Delhi, 1968, p. 92

१· शाहूच्या सुटकेबद्दल शाहूने आज्जमशाहाचा प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रात राज्य करावे·

२· शाहूने आज्जमशाहाचा विश्वास संपादन करण्यासाठी आई येसूबाई, पत्नी आणि दासी विरूबाई आणि त्याचा अनौरस सावत्र भाऊ मदनसिंग यांना ओलिस ठेवणे·

या दोन अटींच्या बदल्यात शाहूची सुटका करण्याचे आज्जमशाहाने मान्य केले आणि त्याला दक्षिणेच्या सहा सुभ्याची सरदेशमुखी दिली व तेथे चौथाई वसूल करण्याचाही अधिकार दिला· तसेच शाहूची गोंडावन, गुजराथ आणि तंजावर, या तीन प्रांतांचा गव्हर्नर म्हणूनही नेमणूक दिली·[१९]

शाहूची सुटका अशा अटींच्यावर झाल्याची बातमी गुप्त राहाणे अशक्य होते· तसेच शाहूचा मोगलांनी दिलेला अधिकार ताराबाईने मान्य करावा असेही नव्हते· शाहूला असे अधिकार मिळतात ताराबाईने सुद्धा आपल्या मुलाच्या नावाने औरंगजेब ह्यात असतानाच त्याच्याकडून अशा प्रकारची सनद मिळवण्याचा प्रयत्न केला होता· आणि औरंगजेबानेही त्यात काही फेरफार करून सरदेशमुखीचे अधिकार देण्याचे फर्मान ताराबाईच्या मुलाच्या नावावर काढले होते· पण ते त्याने परत घेतले आणि त्यासंबंधी तो पुन्हा विचार करीत असतानाच मरण पावला होता·[२०] रामचंद्र पंत या सर्व घटनांचा साक्षीदार होता· किंबहुना ताराबाईच्या गोटात जे काही घडत होते, ते त्याच्याच सल्ल्याने आणि उपस्थितीत घडत होते· तेव्हा ताराबाईचा मुलगा शिवाजी व संभाजीचा मुलगा शाहू, या दोन मालकांच्या पैकी कायदेशीर मालक शाहूच असल्याने, त्याचा शाहूकडे ओढा असणे स्वाभाविक होते· तरीही शाहूच्या गैरहजेरीत औरंगजेबाच्या विरूद्ध ताराबाईच्या नेतृत्वाखाली मराठा

१९· *Ibid.*, pp. 122 - 123.

२०· Elliot and Dowson., *op. cit.*, p. 409

राज्य रक्षण करण्यासाठी त्याने महत्त्वाचे कार्य केले होते. मराठा सरदारांचा विश्वास संपादन केला होता. त्यामुळे जे राज्य आपण टिकविले, ते सोडून म्हणजे ताराबाईचा पक्ष सोडून शाहूच्या पक्षाला, तो मिळू शकत नव्हता. शाहूचा विरोधक म्हणूनच काम करणे त्याच्यापुढे पर्याय होता. तरीही, शक्यतो छत्रपतीच्या दोन वारसांतील भांडण मिटविण्याकडे त्याचा कल होता. तशातच ताराबाईने रामचंद्र पंतासह प्रमुख मराठा सरदाराकडून एकनिष्ठतेची शपथ घेतलेली होतीच. स्वाभाविकच यापुढे ताराबाई सांगेल, त्याप्रमाणे वागणे रामचंद्र पंताला क्रमप्राप्त होते. शाहूच्या आगमनाची बातमी ताराबाईला आणि महाराष्ट्रातील लोकांना कळल्यावर फार मोठी खळबळ माजली होती. प्रसंग अतिशय कठीण होता. पंताचा शाहूबरोबर तो यायला लागण्याच्या सुमारास आतून पत्रव्यवहार होता, असा ताराबाईला संशय होता.[27] म्हणून तिने रामचंद्रपंताला कैदेत ठेवलेले होते. पण शाहू महाराज महाराष्ट्राच्या हद्दीत आल्याचे कळताच तीने, कठीण प्रसंगाचे भान ओळखून रामचंद्र पंताला खुष करण्याचा प्रयत्न केला. त्याची कैदेतून मुक्तता केली. आणि त्याच्या मांडीवर राजारामाचे दोन पुत्र-शिवाजी आणि संभाजी यांना बसविले. पंतानी त्या दोघांचे शाहोही करावे असा निर्णय घेण्याचे पंतावरच सोपविले. परिणामी पंत ताराबाईच्या चतुर धोरणात अडकून पडले. ताराबाईचा मुलगा वयाने ज्येष्ठ असल्याने त्यांनी त्याला राजाराम महाराजाचा उत्तराधिकारी म्हणून मान्य केले व एकनिष्ठतेने स्वराज्याच्या रक्षणासाठी काम करण्याचे अभिवचन ताराबाईला दिले. त्यावेळी पासून पंतानी सरळपणे ताराबाईचा पक्ष मान्य करून आपल्या जीवन कार्याची वेगळी सुरवात केली. या प्रकारची एकूण हकीकत वासुदेव शास्त्री खरे यांनी

---

27. संगोसराजाराम., पृ. १५५-१५६

पुढील प्रमाणे दिली आहे--

"रामचंद्रपंत हे ताराबाईचे मुख्य कारभारी होते, तरी अलीकडे त्यांचा त्यांवर विश्वास नव्हता. त्यांची सारी भिस्त परशुरामपंतावर होती. परशुरामपंत व रामचंद्रपंत यांचे वैमनस्य होतें. त्यामुळे रामचंद्रपंतानी जो कारभार करावा तो प्रतिनिधी ताराबाईस भलतेंच समजावून मोडवावा, असें नेहमीं होऊं लागलें. व त्यामुळे रामचंद्रपंत यांस राग येऊन त्यांनी शाहू महाराजास काही उत्तेजनपर निरोप पाठविला. हें वर्तमान ताराबाईस कळतांच तिनें रामचंद्रपंताच्या पायांत रुप्याची बेडी घालून त्यास वसंतगडावर कैदेत ठेविले. त्या योगानें रामचंद्रपंतांस अर्थातच अधिक क्रोध येऊन त्यांनी धनाजी जाधव वगैरे मराठे सरदार फितूर करून त्यास महाराजाकडे पाठवून दिले. परशुरामपंत प्रतिनिधी लढाईच्या इराद्यानें शाहू महाराजांवर चालून गेला खरा, परंतु लढाईंत जाधवराव वगैरे सरदार तिकडे मिळालेले पाहतांच तो पळून साताऱ्यास आला. नंतर शाहू महाराजांनीं सातारा काबीज करून परशुरामपंतास कैद केलें. हे वर्तमान येताच ताराबाईने रामचंद्रपंतास कैदेंतून सोडून राणियास आणिले आणि आपला मुलगा शिवाजी व सवतीचा मुलगा संभाजी या दोघांस रामचंद्रपंताच्या मांडीवर बसवून राज्य संरक्षण करण्याविषयी त्यांची विनवणी केली, तेव्हा रामचंद्रपंत पुन: राज्यकारभार चालवूं लागले. इचलकरंजीचे संस्थापक नारो महादेव यांची त्यास उत्तम प्रकारची मदत होती. रामचंद्रपंतांचे मन वळविल्यावर, त्यांच्या मार्फत धनाजी जाधव, खंडो बल्लाळ व परशुराम पंत यांनाही शाहूकडून फोडून, आपल्या बाजूस आणण्याचा प्रयत्न ताराबाईनें केला, पण हा बेत फारसा सिद्धीस गेला नाही."[२२]

शाहू विरुद्धचा संघर्ष:

शाहू महाराष्ट्रात आल्यानंतर प्रथमत: अंबू पांडे त्यास खानदेशात

---

२२. खरे, वा.वा., इचलकरंजी संस्थानाचा इतिहास, पुणे,१९१३,पृ.२२.

जाऊन मिळाला.[२३] त्यानंतर महादजी कृष्णा जोशी आणि गदाधर प्रल्हाद यांच्या सांगण्यावरून शाहूने वेगवेगळ्या मराठा सरदारांना आपण आल्याची खबर दिली. त्यातील एक महत्त्वाचे पत्र पुढील प्रमाणे आहे--

"स्वस्ति श्री महाराज राजश्री शाहूजी राजेसाहेब यांणी मताजीराव जेधे देशमुख तर्फ रोहिडखोरे यासी आज्ञा केली ऐसी जे स्वामीचा भाग्योदय प्रसंग होऊन दक्षण प्रांती येणे जाहले. सांप्रत स्वामीचा मुक्काम मौजे गोरखड प्रांत उतराण प्रांत खानदेश येथे जाला. पुढे कूच दर कूच येईजेत आहे. ऐसियास तुम्ही पुरातन स्वामीचे सेवक एकनिष्ठ आहेत. याप्रसंगी स्वामीच्या दर्शनास येऊन आपले सेवेचा मुजरा करून घ्यावा ऐसे आहे. तर स्वामीचे येणे समीप होताच आपले जमावनिशी येऊन भेटी घेणे. भेटीनंतर स्वामी तुमचे उर्जित विशेषाकारे करितील..., ता.१९ रबिलाखर सुरू समान सबा व अलफ (९ जुलै १७०७) ...."[२४]

आपण आल्याच्या आगमनाची पत्रे जशी शाहूने पाठविली तशीच, पत्रे पाठवत असताना त्याने मराठा सरदारांना त्यांच्याकडे असलेल्या वतनाची सुध्दा हमी दिलेली होती. त्या दृष्टीने पुढील एक पत्र अत्यंत बोलके आहे--

"स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित नाम संवत्सरे आश्विन शुध्द द्वितीया भौमवासरे (१६ ऑगस्ट १७०७) क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती यांणी देशमुख व देशपांडे पारनेर यांसी आज्ञा केली ऐसी जे.... सांप्रत राजश्री शाहू राजे ताम्रुचा सेनेतून निघून त्या प्रांते आले आहेत. ते कागदपत्र चालवितील. नसता कथला करितील, तरी त्यास काही संबंध नाही. याकरिता त्यांचे कागदपत्र

---

23. Raghubir, Singh., Malwa in Transition., p. 62

२४. राजवाडे, वि.का., मइसा., खं १५, ले.३५८, पृ. ३८८.

२५. मावजी, पु. वि., व पारसनीस, द. ब., पेशवे दप्तरातील सनदापत्रांची माहिती, मुंबई, १९१३, ले.४६, पृ. ११३-११४.

एकंदर न घेणे व त्याकडे परगण्यापैकी कबूल न देणे. जो कोणी याउपरि त्यांचा कागदपत्र मागील त्याचा परिछिन्न मुलाहिजा होणार नाही.....[२५]

शाहू अशा त-हेने महाराष्ट्रात येत असताना त्याने ताराबाईच्या पक्षातील सरदार आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न चालविला होता. त्याचे आणि ताराबाई, यांचे एकमेकाविरूध्दचे डावपेच सुरु झाले होते. मोंगलांच्याकडून शाहूला सनदा मिळाल्या तर त्याचे वजन दक्षिणेत वाढेल व आपल्या पक्षातील लोक फुटले जातील, याची ताराबाईला भीती होती. म्हणूनच औरंगजेबाच्या विरूध्द सतत ७ वर्षे ठाम निर्धाराने लढणा-या ताराबाईने औरंगजेबाचा दुर्बल पुत्र जुमलतुलमुल्क म्हणजे मुनीमखान याच्या मार्फत शेकडा ९ रूपये सरदेशमुखीचे फर्मान व चौथाई मिळविण्याचा आपला मुलगा शिवाजी याच्यासाठी प्रयत्न केला होता.[२६] पण तिला यश आले नव्हते. तेव्हा शाहूच्या सुटकेनंतर शाहू व ताराबाई असे सरळसरळ दोन पक्ष निर्माण झाले होते. त्यावेळी पोर्तुगीज मात्र मराठयांच्या या अंतर्गत भांडणाकडे लक्ष देऊन होते. शाहू खानदेशातून महाराष्ट्रात येऊ लागला, तेव्हा त्याला सुजानसिंग रावळ, चोकील आणि बाळाजी विश्वनाथ, हे जाऊन मिळाले. त्याचबरोबर मोगलांच्या नोकरीत असलेली अनेक मातब्बर मंडळी सुध्दा त्याला जाऊन मिळाली. कारण कैदेतून सुटल्यानाच मोगलांचा मांडलिक म्हणून तो सुटलेला होता. तेव्हा आपलाच अधिकारी म्हणून ब-याच मोगल सरदारांनी जे मराठे होते, त्यांनी शाहूला आपला पाठिंबा जाहीरपणे दिला.[२७] खानदेशात लंबकानी येथे सुजानसिंग रावळ, या जमीनदाराकडे सामान्यत: एक महिनाभर राहिल्यावर व त्याच्याकडून भरपूर मदत घेतल्यावर तो महाराष्ट्राकडे आला. पुढे त्याला बापूजी सोनाजी दिघे, व परसोजी भोसल्यांचा उजवा हात भेटण्यास आला. त्यानंतर परसोजी भोसले आणि त्याचा बंधू, हे आपल्या सैन्यासह त्याला मिळाले. हे भोसले आणि त्यांचा बंधू

---

२६. गर्गे, स.मा., <u>उपरोक्त</u>., पृ.७८.

२७. Brij, Kishore., <u>op. cit.</u>, p. 99

म्हणजेच नागपूरच्या भोसले घराण्याचे पूर्वज. भोसले बंधू शाहूला मिळाल्यावर शाहूची ताकद वाढली. पण त्याच वेळी, इकडे ताराबाईने त्याच्या खरे खोटेपणाबद्दल शंका व्यक्त केली. म्हणजे पूर्वीच्या दोन तोतया शाहू-प्रमाणेच हा असावा, अशी शंका व्यक्त केली. एकीकडे ताराबाईंच्या गोटामध्ये असा खल चालू होता तर दुसरीकडे अनेक सरदार शाहूला मिळू लागले होते. जुलै १७०७ मध्ये शाहू कुसुबीला पोहोचला. तेथून ऑगस्टमध्ये अहमदनगरकडे निघाला. शाहूने महाराष्ट्रात येताच, आपण मराठ्यांचे राज्याचे उत्तराधिकारी आहोत आणि मोगल बादशहाने आपल्याला मान्यता दिली असल्याचे जाहीर केले होते. तसेच राजघराण्यातील ज्येष्ठ व्यक्ती म्हणून ताराबाईंचा त्याने आशीर्वाद मागितला होता. तिच्या मानसन्मानाची ग्वाही पत्राद्वारे दिलेली होती.[२८] परंतु ताराबाईने, तो तोतया असल्याचे जाहीर करून, पूर्वीच्या तोतयाचे जसे झाले तसेच त्याचेही होईल; असे जाहीर केले. पण ब्रीज किशोर म्हणतात, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील लोकांना ताराबाईची ही भूमिका मान्य नव्हती. शाहूच्या खरेपणाविषयी कोणालाच संशय नव्हता. आणि परसोजी भोसले यांनी शाहूबरोबर एका ताटात जेऊन, जो काही संशय लोकांच्या होता तोही दूर केला होता.[२९]

## शाहूचा खरेपणा सिध्द झाल्यावर

शाहूचा खरेपणा अशा तऱ्हेने सिध्द झाल्यावर महाराष्ट्रात शाहू हाच, गादीचा खरा वारसदार समजून त्याच्याकडे लोक जाऊ लागले होते. ताराबाई त्यांना थांबवू शकत नव्हती. त्यावरून, तिला हेही कळले होते की,

---

२८. <u>समोसशाबा</u>, पृ.३४
२९. Brij., Kishore., <u>op. cit.</u>, p. 101

शाहू हा खरा आहे, तोतया नाही. म्हणून तिने मेतवडेकर सोमनाथ देसाई यांना पाठवलेल्या पत्रात शाहू तोतया-असल्याबद्दलचा उल्लेख केलेला नाही.[३०] येसुबाई आणि सकवारबाई, यांनी सुद्दा मोगलांच्या तुरुंगातून गुप्तपणे ताराबाईशी जो पत्रव्यवहार ठेवला होता, त्यानुसारही शाहूच्या सत्यतेची खात्री तिला पटलेली होती.[३१] पण तिला सत्ता सोडावयाची नव्हती.

तेव्हा शाहूची सत्यता पटल्यावर, ताराबाई अडचणीत आली. तिला तर आपल्या मुलासाठी सत्ता हवी होती. आणि ती सत्ता टिकविण्यासाठी रामचंद्रपंताची मदत घेतल्याशिवाय तिच्यापुढे आता पर्याय उरलेला नव्हता. तशातही तिने चिटणीस बखरीत सांगितल्याप्रमाणे शाहूचा नयनाट करण्याचा केलेला प्रयत्न फसला होता.[३२]ताराबाईनी त्यानंतर खंडोबल्लाळ, यास शाहूची सत्यता ओळखण्यासाठी हिंगणी येथे परसोजी भोसल्याचा सख्खा भाऊ बापूजी भोसले याच्याकडे पाठवले होते. उद्देश असा होता, की खंडो बल्लाळ या वडिलाला शाहूच्या लोकांनी ठार मारलेले होते. तेव्हा खंडो बल्लाळ तिच्या मताप्रमाणे वागेल. तथापि खंडो बल्लाळानेही, भोसले बंधूची भेट घेऊन आल्यानंतर महाराष्ट्रात आलेला शाहू, हाच खरा असल्याचे सांगितले.[३३] मग ताराबाईने शाहूच्या विरोधी हालचाल करण्याला प्रारंभ केला. अर्थात शाहूनेसुद्दा ताराबाईची भूमिका लक्षात घेऊन, आपले जे मार्गदर्शक होते, त्यांच्यानुसार म्हणजे रायभानजी काका भोसले, जोत्याजी केसरकर आणि उद्योग योवदेव यांच्या सल्ल्याने कोणत्याही परिस्थितीत

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३०. सगोसमरि., मध्यविभाग १, पृ.५.

३१. सगोसशाबा., पृ. ३७.

३२. चिटणीस,गो.खं.,उपरोक्त., पृ.३६-३८.

३३. काळे,या.मा., संपा.नागपूरकर भोसले यांची बखर,मध्यप्रांत संशोधन मंडळ, नागपूर, दुसरी आवृत्ती, १९३६, पृ.१९-२२.

गादी मिळविण्याचा निर्धार केला होता. अशा परिस्थितीत ऑक्टोबर, १७०७ मध्ये, ताराबाईंनी शाहूच्या विरुध्द लढण्यासाठी सैन्य पाठवण्याची योजना आखली. त्याचा परिणाम म्हणूनच तारीख १२ ऑक्टोबर १७०७ रोजी खेड येथे लढाई झाली. आणि तीमध्ये शाहूचा विजय झाल्याने शाहूला छत्रपती म्हणून मराठ्यांनी घोषित केले.[३४] त्यानंतर, शाहू नोव्हे. १७०७ मध्ये सातारा येथे आला. तारीख १२ जानेवारी १७०८ रोजी त्याचा राज्याभिषेक झाला.[३५]

पण शाहूने घरातील यादवी थांबविण्यासाठी म्हणजे ताराबाई या आपल्या चुलती बरोबरचे भांडण थांबविण्यासाठी आणि स्वत:चे छत्रपती पद सुरक्षित ठेवण्यासाठी तह करण्याचा खास प्रयत्न केला.[३६] त्यावेळी वारणा नदी, ही दोन राज्यांची सरहद्द करावी, अशा स्वरूपाचा मजकूर होता. पण ताराबाईंनी शाहूच्या त्या प्रस्तावाला विरोध केला. आणि तिने परशुराम त्र्यंबक व शंकराजी नारायण यांना शाहूकडे आपली वकीली करण्यासाठी पाठविले. पैकी शंकराजी नारायण याने १७११ मध्ये आत्महत्या केली. परशुराम त्र्यंबक याला शाहूने अटक केली. तेव्हा पुन्हा रामचंद्र पंतानी मदत घेण्याशिवाय तिच्यापुढे पर्याय नव्हता. तेव्हा रामचंद्रपंत वसंतगड येथे तिने ठेवलेल्या तुरूंगात होते. मग त्यांना तेथील तुरूंगातून पन्हाळा येथे आणले. तेथे तिने रामचंद्रपंताची समजूत काढली. शाहूने मोगलांचे आधिपत्य स्वीकारून महाराष्ट्रात काम करण्याचे मान्य केल्याचे पंताच्या लक्षात आणून दिले. तेव्हा त्या परिस्थितीत शाहूच्या उलट लढणे हे मोगलांच्या उलट लढण्यासारखे होते, असे तिने पंताना पटवून दिले. त्याचा रामचंद्र पंतावर योग्य परिणाम झाला व त्यानी ताराबाईच्या बाजूने

---

३४. Brij, Kishore., op. cit., p. 112

३५. Ibid., p. 115

३६. अ) Ibid., p. 116

ब) राजवाडे, वि.का., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २०, धुळे, १९१५, ले.२८२ पृ. ४१०-४११.

काम करण्याचे ठरवले. अर्थात, त्याच वेळी शाहूला सुध्दा रामचंद्र पंताची गरज राहिलेली नव्हती. कारण शाहूच्या सुध्दा लक्षात आले होती की रामचंद्र पंत द्विधा अवस्थेत असून त्यांचा कल ताराबाईकडे जास्त आहे.[३७]

## ताराबाईकडून पन्ताना पुर्वीचा अधिकार:

इकडे ताराबाईने रामचंद्रपंताना त्याचे पूर्वीचेच पद देऊन मानसन्मान केला होता. त्या पदाची पुन्हा प्राप्ती झाल्यावर पंतानी पूर्वीचे सर्व काही विसरुन ताराबाईना पक्ष बळकट करण्यासाठी सर्व सामर्थ्य पणाला लावले. पुढे रांगण्याहून ताराबाईसह रामचंद्रपंत पन्हाळ्यास आले. व तेथे ताराबाईचा कारभार पाहू लागले. इचलकरंजी जहागिरीचे संस्थापक झालेले नारो महादेव यांच्या तर्फे पंतानी शाहूच्या पक्षात गेलेले धनाजी जाधव, खंडो बल्लाळ चिटणीस व परशुराम त्र्यंबक यांना पुन्हा ताराबाईच्यापक्षात आणण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना त्यात यश आले नाही.[३८] त्यावेळी शाहूचा प्रभाव वाढत चालला होता. शाहू ताराबाईला स्वस्थ राहू द्यायला तयार नव्हता. शाहूच्या बाजूला मोठ्या प्रमाणात मराठा सरदार गेलेले होते. तेव्हा सरदेसाई यांनी सांगितल्याप्रमाणे ताराबाईने सुध्दा शाहूला नष्ट करण्याचा नाद सोडून दिला व रामचंद्रपंतानी सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊन तिला "कोल्हापूर संस्थान" आपले म्हणून राखण्याचा सल्ला दिला.[३९] तसेच "रामचंद्रपंताने आंग-याची मदत घेऊन आणि विशाळगडच्या कृष्णाजी भास्कर याजबरोबर फौजा पाठवून सातारास नरम केले. आणि त्याच्यापासून अनुकूल तह करून घेतला."

---

३७. Brij, Kishore., op. cit., pp. 116 - 117. ३८. खरे, वा.वा., उपरोक्त, पृ.22.
३९. मराठेशाही., मध्यविभाग १, पृ.२०.

मध्यंतरी जून १७०८ मध्ये शाहूने पन्हाळा जिंकला होता. परंतु त्या ठिकाणी सेनापती जाधवाना फार मोठी जखम झाली होती. आणि त्या लढाईचा परिणाम म्हणून धनाजी जाधव वडगाव येथे त्या जखमेचा परिणाम म्हणून तारीख २७ जून १७०८ रोजी मरण पावले होते. खानदेशाप्रमाणे शाहू महाराजाला महाराष्ट्राच्या रांगणा-पन्हाळा या दक्षिणभागात यश आलेले नव्हते. शाहू, ताराबाईच्या पारिपत्यासाठी सातारा-याहून पन्हाळयाकडे येऊ लागला होता. त्यावेळी रामचंद्रपंत ताराबाईसह राजकुटुंब बरोबर घेऊन रांगणा किल्ला येथे गेला होता. शाहूने रांगण्यास वेढा घातला, तेव्हा रामचंद्र पंत, गिरजोजी यादव, हिंदुराव घोरपडे यांनी शर्थीने लढा देऊन किल्ल्याचा बचाव केला. ताराबाईशी एकनिष्ठ राहून शाहूच्या विरुध्द कारस्थाने करण्याच्या अनेक योजना पंतानी आखल्या होत्या. त्यातील अत्यंत महत्त्वाची योजना म्हणजे शाहू रांगणा येथे लढाईत गुंतला असताना सातारा जिंकून घेणे व तो ताराबाईच्या ताब्यात देणे. त्यासाठी त्याने सचिव सयाजी मल्हार, सुभानजी इत्यादी लोक,जे शाहूच्या पक्षात होते, ते फोडून ताराबाईच्या पक्षात आणण्याचे प्रयत्न केले. त्याच्या या योजनेचे कौतुक करून ताराबाईने रामचंद्र पंत रांगणा येथे असताना त्यांना जे पत्र पाठवले होते ते खालील प्रमाणे आहे.

"श्री रमाकांत

राजेश्री रामचंद्र पंडीत अमात्य यास.

प्रती श्रीमत् मातुश्री ताराबाई उपरी. तुम्ही पत्रें पुरवणी या २ पाठविल्या त्या प्रविष्ट जाल्या. त्यामध्यें लिहिलें कीं, सातारियास राजेश्री केसो त्रिमल आहेत त्याकडे राजकरण करून रोख करून पहावा. याकरितां राजेश्री

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

हिंदुराव व राजेश्री गिरजोजी यादव यांनी विश्वासाने पत्र पाठविलें आहे कीं, तुम्हीं मातोश्री साहेबांचे पायाशी निष्ठा धरून ज्या स्थळीं आहांत तें स्थळ हस्तावस्य करून देणें आणि आपला मुजुरा करून घेणे. एवढें कार्य संपादिली यावर तुमचे नातू निळोपंताचे स्त्रीचे पदरीं घातले आहेत त्यास पेशवाई द्यावी. तुम्हीं सर्वस्व कारभार करावा. ए विषयी आम्हीं धण्याजकडीं विनंती करून अभिष्ट सिध्दिस पाववितो म्हणून विशदर्थे पत्र पाठविलें आहे. त्याचे पुत्र राजेश्री बाबूराव केशव याकरवीं लेहविलें आहे. जरी साहेबाचे पुण्येंकरून तिंहीं काम दिला तरी यावर स्वा अस्मात येतें. फिरोन मनसबा उभा राहतो. या करितां पत्रे पाठविली आहेत म्हणून लिहिलें तें अक्षरशा विदित जालें. तुम्हीं जो सल अगर श्रम कराल तो आमच्या लिहिल्याव कराल एतदर्थी सर्वविषयी भरोसा तुमचा मानिला आहे. याकरितां तुम्हीं जी पत्रें पाठविलीं तीं उत्तम पाठविलीं. त्यांणीं निष्ठा धरून कार्यसिध्द केलीया तरी त्यांचे अभिष्ट तुमचे वचनाप्रमाणे सिध्दीस पावलें जाईल."४० पुढे त्याच पत्रात ताराबाईने रामचंद्रपंताला बरोबरीच्या सरदारांबरोबर एकदिलाने राहून मोहिम कशी यशस्वी करावी यासाठी प्रेरणा दिली. त्या सरदारांच्यामध्ये त्रिबंक शिवदेव, केसो महादेव, रामचंद्र महादेव, हिंदुराव घोरपडे, गिरजोजी यादव आणि सुभानजी, हे निष्ठेने सेवा करीत असल्याबद्दल त्यांचा त्याच पत्रात गौरव केला आहे. रामचंद्रपंताच्या कर्तृत्वामुळे व सरदारांच्या शौर्यामुळे शाहूचा निभाव बिलकूल लागणार नाही, याची खात्री ताराबाईला पटली होती. म्हणून रामचंद्रपंतास तिने शाबासकी देऊन गौरव करताना ती म्हणाते, "शाहू राजे याचे कारन मोडोन स्वप्रभ होऊन जाणाती. म्हणून विशदर्थे लिहिले कीं तुम्हां विषयी द्रव्याविषयी वचन गुंतले आहे खरें करावे लागेल. म्हणून जरी जी योजना तुम्हीं योजिली तें उत्तम आहे. आणखी

४०. गोरे, रा.ग., <u>उपरोक्त</u>., पृ. ६७-६८.

राज्य सुरक्षित झाले. ज्याणी या समयांत सेवा केली त्याचे गोष्टे न करोवे तरी कोणाचे करावे. त्यामध्ये तुम्हासारिखे लोक मध्यस्त असतां तुमचे वचन गुंतले तेंच आमचें वचन."

रांगणा किल्ल्याची मोहिम, तो किल्ला जिंकता येणे कठीण असल्याने ती अर्धवट ठेवून शाहू साता-याकडे गेला व हा प्रदेश भोसले यांनी लढवत राहावा, अशी व्यवस्था करून दिली. त्यानंतर शाहूने मराठा राज्य संस्थापक छ. शिवाजी यांच्या केळचा दक्षिणेकडील स्वराज्याचा प्रदेश घ्यावयाचा प्रयत्न करू लागला. पण ताराबाईने त्याचे काही चालू दिले नाही. अशातच शाहूच्या बाजूने लढत असताना परसोजी भोसले इ.स. १७१० मध्ये मरण पावला. त्याच्या जागी शाहूने कोन्होजी भोसल्याची नेमणूक केली. त्यावेळी ताराबाई रामचंद्रपंताच्या पाठिंब्यावर "स्वतंत्र राज्य" निर्माण करण्याच्या उद्योगात गुंतलेली होती. तिने पंताना पुढे करून मोगलांशी सुध्दा पोट करण्याचा प्रयत्न केला. त्याच काळात धनाजी जाधवाचा मुलगा चंद्रसेन जो शाहू महाराजांच्या पक्षात होता, तो उघड उघड ताराबाईला येऊन मिळाली होता.[४१] चंद्रसेन जाधव व शाहूचा मुख्य सल्लागार बाबाजी विश्वनाथ यांचे जमत नव्हते. म्हणून तो ताराबाईच्या पक्षाकडे आलेला होता. त्यामुळे पुन्हा एकदा ताराबाईचा रामचंद्रपंतावरील विश्वास कमी झाला आणि ती चंद्रसेन जाधवाच्या सल्ल्याने काम करू लागली. कान्होजी आंग्रे याला रामचंद्र पंताने ताराबाईच्या पक्षाकडे वळवलेला होता. तथापि तो उघडपणे शाहूला विरोध करीत नव्हता. पण निजाम-उल्ल-मुल्क यांने त्यावेळी ताराबाईला पाठिंबा देण्याचे धोरण स्वीकारले होते. साहजिकच ताराबाईचा

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

४१. अ) Sinha, H.N., Rise of The Peshwas, Indian Press, Allahabad, 1954, p. 9

ब) राजवाडे, वि.का., मराठ्यांच्या इ. सा., खंड २रा, कोल्हापूर १९००, पृ.९.

पक्ष बळकट होऊन शाहूचा पक्ष दुबळा होणार होता. म्हणून बाबाजी विश्वनाथाने त्या कठीण काळात कान्होजीला आंग्रेना शाहूच्या पक्षात आणले. हे सर्व घडत असतानाच ताराबाईचा हट्टी स्वभाव, संशयी भूमिका यामुळे कोल्हापूरच्या मराठा राज्यात साशंक अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीचा परिपाक म्हणूनच कोल्हापूरात रक्तहीन राज्यक्रांती झाली. तिला व तिचा पुत्र शिवाजी यांना अटकेत ठेवण्यात आले. आणि तिच्या सवतीचा मुलगा संभाजी याला छत्रपती करण्यात आले. आणि आ. संभाजीने रामचंद्र पंन्ताना पुन्हा छत्रपतीचे मुख्याधिकारी म्हणून नेमले.

कोल्हापूरात क्रान्ती का झाली ?

ताराबाई आणि शाहू यांचा संघर्ष लवकर संपुष्टात यावा अशी परिस्थिती नव्हती. विशेषत: शाहूचा सेनापती चंद्रसेन जाधव ताराबाईला येऊन मिळाल्यावर सातारा आपण सहज जिंकू असा आशावाद ताराबाईला होता. तशातच ताराबाई आणि तिची सवत म्हणजे राजारामाची दुसरी बायको या दोघींच्या मध्ये राजसत्तेवरुन मतभेद वाढतच चाललेले होते. तशातच चंद्रसेन जाधवाचा सुध्दा ताराबाईवरचा विश्वास उडाला. कारण तो सेनापती म्हणून ताराबाईची बाजू समर्थपणे लढावा एवढा शूर योध्दा व मुत्सद्दी सुध्दा नव्हता. त्याला शाहूचा पक्ष सोडून ताराबाईकडे येताना केवळ स्वार्थ साधावयाचा होता. ताराबाईकडे आल्यानंतर त्याने निजाम उल्ल-मुल्क याची मदत ताराबाईसाठी घेण्याची वकीली केली. पण ख-या अर्थाने त्याला स्वत:लाच त्यामधून स्वार्थ साधावयाचा होता. ब्रिज किशोर यांच्या म्हणण्या प्रमाणे त्याला स्वत:चे काही प्रमाणात स्वातंत्र्य निर्माण करावयाचे होते.[४२] शाहूच्या पक्षातून सर्जेराव घाटगे जे कोल्हापूरकडे आले होते, ते तसे नव्हते. म्हणूनच अखेरपर्यंत कोल्हापूरच्या पक्षात राहिले.

४२. Brij, Kishore., op. cit., p. 140

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.

चंद्रसेनाकडून अशी फसवणूक झाल्यावर ताराबाई सर्वस्वी रामचंद्रपंतावर अवलंबून राहिली. रामचंद्रपंताने इतर मराठा सरदारांच्याप्रमाणे स्वतःच स्वार्थ साधण्यासाठी अनेक वतेने व इनाम मिळविले.[४३] पण त्याने केव्हा विश्वासघात किंवा द्रोह सुध्दा केला नाही.[४४] रामचंद्रपंताने छत्रपतीच्या दोन घराण्यांमध्ये समेट करण्याचा जरूर प्रयत्न केला. पण तो अशक्य झाल्यावर त्यांने ताराबाईच्या पक्षात राहाण्याचे मान्य केले होते व शेवट पर्यंत तो तिच्याच पक्षात राहिला.

चंद्रसेन जाधवाने ताराबाईला निजामाबरोबर सलोखा करण्याचे धोरण आखले व त्याबदल्यात निजामाकडून ताराबाईच्यासाठी शाहूच्या विरुध्द लढण्याचे मान्य केले. रामचंद्रपंताला हे धोरण मुळापासून मान्य नव्हते. निजामाची दख्खनचा सुभेदार म्हणून फेब्रुवारी १७१३ मध्ये नियुक्ती झाली होती. पण प्रत्यक्षात तो औरंगाबादला ऑक्टोबर १७१३ मध्ये आला होता. पुढच्या वर्षी म्हणजे १७१४ साली तारीख ११ जुलै ते तारीख १४ ऑक्टोबर १७१४ च्या दरम्यान कोल्हापूरच्या राजवाड्यात रक्तहीन राज्यक्रांती झाली. ताराबाईला सत्तेवरून काढून टाकून तुरुंगात टेवण्यात आले होते. या बाबतीत ब्रिज किशोर म्हणतात की ताराबाई चंद्रसेन जाधवाच्या पूर्णपणे कह्यात गेलेली होती. तिला शहाणपणाचे चार शब्द रामचंद्रपंताने सांगावे, अशी परिस्थिती राहिलेली नव्हती. तिच्या निजामाच्या बरोबरच्यातहाने, केवळ शाहूच नष्ट होणार होता, असे नव्हे, तर ताराबाईचे राज्य म्हणजे कोल्हापूरचे राज्य सुध्दा मोगलांच्या वतीने निजाम नष्ट करणार होता, अशी भीती रामचंद्रपंताला होती. म्हणून त्यांने ताराबाईची निजामाबरोबरचा तह नष्ट करण्याची बोलणी करण्याऐवजी राज्यक्रांती घडवून आणली असावी व तिला सत्तेहून काढून टाकली असावी.[४५]

---

४३. माळवी, पु. वि., ) संपा. करवीर-सनदापत्रे., पृ १८७.
  व )
  पारसनीस, द. ब., )

४४. Brij. Kishore., *op. cit.*, p. 140

४५. *Ibid.*, p. 141.

कोल्हापूरच्या राजवाड्यात राज्यक्रांती कशी घडून आली याविषयी स.मा. गर्गे यांच्या मताप्रमाणे, आवश्यक ती माहिती देणारे पुरावे उपलब्ध नाहीत.[४६] या राज्यक्रांतीच्या बाबतीत वा.सी. बेंद्रे यांनी निष्कर्ष काढताना म्हटले आहे की ताराबाईने राजारामाच्या मृत्यूनंतर आपला मुलगा शिवाजी याच्या नावाने राज्यकारभार केला. त्या शिवाजीची दोन तीन लग्नेही तिने करून दिली होती. त्या लग्न संबंधातूनच शिवाजीला रामराजा नावाचा मुलगा शिवाजीच्या मृत्यूनंतर जन्मलेला होता. हा शिवाजी "भ्रांशांत" होता. त्यामुळे लढाईत कोणी त्याला भाग घेऊ दिला नव्हता. इ.स. १७१२ नंतर राज्यकारभाराची पत्रे ताराबाईचा सावत्र मुलगा संभाजी याच्या नावावर निघाली. पण त्याला प्रत्यक्षात राज्यपद मिळे नाही. तेव्हा ताराबाई व तिची सवत राजसबाई म्हणजे संभाजीची आई यांच्यात वैर वाढले आणि ताराबाईचा मुलगा शिवाजी याची भ्रांशांत अवस्था जास्त वाढल्याने त्याला सत्तेवरून दूर करणे मंत्रीमंडळास गरजेचे वाटले. त्यातून हे सत्तांतर झाले असले पाहिजे.[४७]

रामचंद्र पन्ताच्या सहाय्याने क्रान्ती:
------------------------------

सरदेसाई यांनी सुध्दा या राज्यक्रांतीत पंताचा हात होता असे स्पष्टपणे कुठे म्हटलेले नाही.[४८] गर्गे यांच्या मते मात्र कोल्हापूरात ही जी राज्यक्रांती झाली त्यावेळी रामचंद्रपंत अमात्यासारखा कर्तृत्ववान, अनुभवी व मुरलेला मुत्सद्दी अलिप्त राहिला असेल, असे समजणे योग्य होणार नाही. त्यांच्या मते "रामचंद्रपंतांच्या सारखा पुरुष पाठीशी असल्याशिवाय एवढे मोठे सत्तांतर घडवून आणण्याचे धाडस राजसबाईंनाही झाले असेल असे मानणेही अवघड आहे."

४६------------------------------------------------------------

४६. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. १०२.
४७. बेंद्रेराजाराम., पृ. ५०८.
[illegible], I. T., [illegible]
४८. सगोणराजाराम., पृ. १५४.
[illegible]

तसेच "राजसबाईंना रामचंद्रपंत अमात्यांचे साहय मिळाले असल्याशिवाय त्यांनी ताराबाईला कैदेत ठेवण्याचे धाडस केले असावे असे वाटत नाही."[४९] पुढे गर्गे यांनी या राज्यक्रांतीचा निष्कर्ष काढला आहे, तो पुढील प्रमाणे आहे—

१) रामचंद्रपंत अमात्य व राजसबाई यांनी संगनमताने शिवाजीला सत्तेवरुन दुर केले व त्या ठिकाणी राजसबाईंचा पुत्र संभाजी यांची स्थापना केली.

२) रामचंद्रपंताना "हुकूमतपन्हा" सारखा श्रेष्ठाधिकार कायमपणे टिकवायचा होता. अर्थात हा अधिकार रामचंद्रपंतानी १७१३ पूर्वी शाहू महाराजाच्याकडून मागितला होता व शाहू महाराजानी सुध्दा तो त्यांना एका पत्राध्दारे [५०] तेऊ केला होता. पण रामचंद्रपंत शाहूकडे गेले नाहीत. तथापि पंताना तो अधिकार शिवाजी राजे म्हणजे ताराबाईचे पुत्र यांनी १ ऑगस्ट १७१४ रोजी दिला असे पत्र आहे.[५१] त्यामुळे पंत शाहूकडे गेले नसावे. अर्थात ते काही सबळ कारण असल्याचे गर्गे यांना सुध्दा पटले नसावे. म्हणूनच गर्गे म्हणतात, की शाहूच्या दरबारी असलेल्या "बाळाजी विश्वनाथाशी स्पर्धा" करण्यापेक्षा आपले स्थान कोल्हापूरातच टिकवावयाचे पंतानी मान्य केले असावे. पण त्यांच्या कारभारात ताराबाई वारंवार अडथळा आणत होती. म्हणून तिला सत्तेवरुन दूर करण्यासाठी त्यांनी "राजसबाईंना सक्रीय साहय केले असावे."[५२] यापुढे जाऊनही गर्गे स्पष्टपणे म्हणतात, की रामचंद्रपंताच्या पाठबळाशिवाय एवढी मोठी क्रांती घडू शकली नसेल.[५३] अशा त-हेने कोल्हापूरात क्रांती घडून आणून रामचंद्रपंतानी आपला हुकूमतपन्हा हा अधिकार शाबूत राखला.

---

४९. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. १०३.
५०. पोतदार,द.वा., व मुजुमदार,ग.ना., संपा. ऐतिहासिक संकीर्ण निबंध,खंड २रा, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९४७, पृ. ७८.
५१. उपरोक्त., पृ. ८२.
५२. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. १०४.
५३. उपरोक्त., पृ. १०५.

### संभाजीच्या काळातील पंताचे कार्य:
५५

कोल्हापूरात राज्यक्रांती होण्याच्या पूर्वीपासून दोन वर्षे अगोदर ताराबाईने संभाजीच्यानावावर राज्यकारभार सुरु केलेला होता.[५४] इ.स. १७१४ मध्ये राज्यक्रांती झाली आणि संभाजी गादीवर बसला. पण त्यावेळी त्याचे वय १६ वर्षाचे होते. म्हणजे राज्यकारभार करण्याच्या दृष्टीने तो अजून लहानच होता. शिवाय गादीवरबसण्यापूर्वी तो आणि त्याची आई राजसबाई यांना बराच काळ ताराबाईच्या तुरुंगात राहावे लागले होते. स्वाभाविकच त्याला गादीवर बसण्यापूर्वी प्रत्यक्ष कारभाराचा किंवा लढाईच्या मोहिमेचा, अशा कोणताही प्रत्यक्ष अनुभव लाभलेला नव्हता. तसेच त्याची आई राजसबाई ही सुध्दा तशी चाणाक्ष राज्यकर्ती किंवा मुत्सद्दी, अशा प्रकारे मोठे नावाजलेली नव्हती. पुत्र आणि माता, अशा त-हेने राज्याचे मालक झाले असले; तरी त्या दोघांनाही राज्यकारभाराचा अनुभव नव्हता व पोचही नव्हता. म्हणूनच गर्गे म्हणतात त्याप्रमाणे कोल्हापूरच्या कारभाराचा सर्व भार रामचंद्रपंत अमात्य यांच्यावरच होता.[५५]

संभाजीच्या मंत्रीमंडळात सिधोजीराव हिंदुराव घोरपडे, हे सेनापती होते आणि परशुरामपंत प्रतिनिधीचे चिरंजीव कृष्णाजी परशुराम, हे प्रतिनिधी होते. शिवाय उदाजी चव्हाण, सारखे मातब्बर सरदार होते. मात्र संभाजी व त्याची आई यांना कारभाराची फारशी माहिती नसल्याने सर्व कारभार रामचंद्र पंताच्या हाती गेलेला होता. त्यांच्या शब्दाबाहेर काही होऊ शकत नव्हते. त्यांच्या अशा वागण्यामुळे सिधोजीराव घोरपडे यांच्याशी त्यांचे फार

५४. बेंद्रेराजाराम., पृ. ५०८.
५५. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. १०९.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दिवस जमले नाही. तसेच कृष्णाजी परशुराम यांनाही प्रभाव पाडू शकला नाही. चंद्रसेन जाधवाच्याद्वारे ताराबाईंनी निजामाशी सलोखा करून साताराच्या शाहूचा बंदोबस्त करण्याचे जे धोरण योजले होते, तेच धोरण रामचंद्रपंताने संभाजीच्या कालात चालू ठेवले. त्यासाठी रामचंद्र पंताने चंद्रसेन जाधव व इतर मराठा सरदारांची मने वळवायचा प्रयत्न केला. तथापी चंद्रसेन जाधवाला संभाजी व निजाम यांचा स्नेह घडवून आणण्या इतपतच कोल्हापूर बरोबर संबंध ठेवावयाचे होते. एरवी तो करवीर राज्याच्या निष्ठेत रहायला तयार नव्हता.[५६] थोरात घराणे मात्र करवीरच्या बाजूला राहिले. रामचंद्र पंतानी संभाजीचा कारभार बळकट करण्यासाठी वृध्दावस्थेत सुध्दा कसून प्रयत्न केले. बाळाजी विश्वनाथ साताराच्या शाहूचा पेशवा झाल्यावर कान्होजी आंग्रे शाहूच्या बाजूला गेला होता. त्या कान्होजी आंग्रेचा मुलगा, दत्ताजी आंग्रे याने १७१५ मध्ये कोल्हापूर राज्याच्या कोकण प्रदेशात उपद्रव सुरु केला होता. तेव्हा त्याचा बंदोबस्त करण्यासाठी रामचंद्र पंतानी ताबडतोब उपाय योजना केली व चांदजीराव राणे असळेकर यांना खालील आज्ञापत्र पाठवले--

"दत्ताजी आंग्रे याणी खारेपाटणाची पट्टी घेऊन गगनगड तनख्याचे गांवांस उपद्रव मांडिला आहे. त्यास तुम्हीं आपले कबिले वरघाटीं ठेवून लोकसहीत गगनगडकरी यांस सामील होऊन स्वारीशिकारी करुन आंग्रे बलखुद होतील ती तजवीज करावी आणि गडचे घेऱ्यांतील गांवांस उपद्रव न लागे असें करावे."[५७]

पंताचे पोर्तुगीजांविषयी धोरण:

रामचंद्रपंत अशा त-हेने कोल्हापूरचे राज्य सांभाळण्याचे कसोशीने प्रयत्न करीत होता, आणि त्याच बरोबर गोव्यामध्ये प्रस्थापित झालेल्या पोर्तुगीज सरकार बरोबर वाटाघाटी करुन पोर्तुगीजांची सत्ता कोणत्याही परिस्थितीत

---

५६. उपरोक्त., पृ. १०९.

५७. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ७४.

कोल्हापूरच्या प्रदेशाकडे वाढता कामा नये, त्याची काळजी घेत होता. तो त्यावेळी गाफील राहिला असता किंवा पोर्तुगीजांचा प्रदेश कोल्हापूरच्या बाजूला वाढेल, असा वागला असता तर पोर्तुगीज सत्तेने कोल्हापूर राज्याचा पश्चिम भाग गिळकृत केला असता. पोर्तुगीजांना धाक दाखवून कोल्हापूर बरोबर मैत्रीने राहाण्यास भाग पाडले होते. पंताच्या या कर्तृत्वाचा पुरावा म्हणजे गोव्याच्या व्हाईसरॉयने कोल्हापूर बरोबर सलोख ठेवण्याविषयी रामचंद्रपंत यांना लिहिलेले पुढील इ.स. १७१४ सालचे पत्र महत्त्वाचे आहे--

"संभाजी राजे ह्यांचे सरदार रामचंद्र पंडित अमात्य ह्यांस आपले उत्तर मिळाले. फार आनंद झाला. आपणाविषयी आणि आपल्या स्नेहाविषयी मला नेहमीच कौतुक वाटत आले आहे. मला आपणास कळवायचे आहे की, मी आपणाला अभिनंदनपर पत्र लिहिले, त्यावेळी आपणाला मी नजराना पाठविणार होतो. परंतु संशय होता म्हणून तो पाठविला नाही. आता संशय मिटला आहे. माझी अशी पक्की खात्री आहे की, ह्या यशाबद्दल मला जो आनंद झाला तो केवळ आपणाशी असलेल्या स्नेहामुळे नसून चांगले राजकारण आणि मैत्री त्यामुळे आहे, ह्याची आपणाला जाणीव आहेच. मला आपणाला सांगायचे आहे की, जी राणी ह्या प्रदेशावर राज्य करीत होती त्या राणीशी आमची खरी खुरी मैत्री असूनदेखील मेलुंदीच्या किल्लेदाराचे आणि आमचे कधीच पटले नाही. कारण, त्याच्या कारकीर्दीत आमच्या प्रजाजनांची नेहमीच लूटमार होत असे. चालू राजवटीत ह्या गोष्टी सुधारतील अशी आशा आहे. मला

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-

आपणास सूचना करायची आहे की, मेलुंदीच्या किल्लेदाराने हया राज्याचे जे काय घेतले आहे, ते परत करण्यात आले पाहिजे. तसेच उभय पक्षांमध्ये वैमनस्य आणि लूटमार हया सारख्या गोष्टी घडता कामा नयेत म्हणून एक करार होणेही आवश्यक आहे. हया प्रकरणी आपण लक्ष घालाल व आपणास आनंद होण्यासारखे प्रसंग घडतील अशी आशा आहे."[५८]

या पत्रानंतर कोल्हापूर छत्रपती व पोर्तुगीज यांच्यामध्ये एक तह झाला होता. त्या तहाच्या पूर्व तयारीसाठी कोल्हापूर छत्रपतींना एक दूत गोव्याला गेला होता. तेव्हा गोव्याच्या व्हाईसरॉयने पुन्हा तहाच्या अटी मंजुरीसाठी संभाजी राजाकडे पाठवून देतो, असे एका पत्राद्वारे कळवले.[५९] आणि त्याच पत्रात म्हटले की "संभाजी राजे हयांना मी उत्तर पाठवीन त्याप्रमाणे रामचंद्रपंडीत आणि त्या किल्ल्याचा किल्लेदार हयांनाही पत्रे पाठविण्याची व्यवस्था केली जात आहे" पण गोवा येथून पाठवलेल्या त्या पत्रावर २१ मार्च १७१६ अशी तारीख आहे. आणि रामचंद्रपंत तारीख ८ फेब्रुवारी १७१६ रोजी मरण पावले होते. कदाचित असे असेल की पंताच्या मृत्यूची खबर पोर्तुगीजांना लवकर कळली नसावी. म्हणून त्यांनी त्यापत्रात पंताचा उल्लेख केलेला आहे. अर्थात असे जरी असले, तरी पंतानी केलेल उपाय योजून पोर्तुगीजांनी कोल्हापूर बरोबर सलोखा निर्माण करावा, असे दबावाचे राजकारण केले होते. म्हणून कोल्हापूरला पुढे पोर्तुगीजांच्या पासून फारसा उपद्रव झाला नाही.

रामचंद्रपंताचा शोक:

कोल्हापूर छत्रपती संभाजी यांचे "हुकूमतपन्हा" म्हणून काम करीत असताना रामचंद्रपंतानी चोखपणे राज्य कारभार केला व सर्वांनाच मार्गदर्शनही केले.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

५८. परेरा, ब्रागांस ए.बे.ट., संपा. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर, खंड तिसरा, आशिया विभाग (भाग १ ते ५), (इ.स. १६६३ ते १७३९), मुंबई, १९६८, पृ.१२५-१२६.

५९. उपरोक्त., १३४.

अर्थात पंताला शत्रू नव्हते, असे नाही. शाहूच्या बाजूचे शत्रू हे तर पंताच्या विरोधात सरळ सरळ होते. राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईने आपला पुत्र शिवाजी याची मुंज करण्याचा हट्ट धरला होता. त्यावेळी पंताना ताराबाईच्या रागाला बळी पडावे लागले होते. पुन्हा सत्तेवर आल्यावर ताराबाईने त्यांना एकदा कैदही केलेले होते.[६०] पण त्या सर्वापेक्षा वाईट असे, की पंताचा सख्खा थोरला भाऊ, नारो निळकंठ, हा सुध्दा पंताच्या विरोधी होता. पंताचे कर्तृत्व व मोठेपणा याचा त्याला हेवा वाटत होता. त्यामुळेच पंताच्या ईर्षेत जाऊन त्याने शाहू कडून पंत अमात्य पदाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न केला होता. पण तो मुळातच कर्तबगार नसल्याने त्या ईर्षेत यशस्वी झाला नाही.[६१]

अशा सर्व धकाधकीच्या परिस्थितीत स्वत:चे स्थान व आसन बळकट करुन पंतानी कोल्हापूर मराठा राज्याचा सांभाळ केला. हा सांभाळ करीत असतानाच त्यांचे वय फार झालेले होते आणि नेमके त्याच वेळी कोल्हापूरच्या गादीवर इ.स. १७१४ मध्ये आलेला संभाजी वयाने लहान होता. तेव्हा आपल्या पश्चात त्याने राज्यकारभार कसा चालवावा, हा उद्देश समोर ठेवून किंवा ग.ह. खरे[६२] व इतिहासकारांनी म्हटल्याप्रमाणे संभाजीने आपल्या आजोबानी म्हणजे छ. शिवाजीनी राज्यकारभार कसा केला, हे समजून घेण्याची इच्छा रामचंद्रपंताकडून [illegible] केली आणि शिवाजी महाराजांच्या राजनीतीचा विचार संभाजी राजाना ग्रंथ रुपाने सांगण्याची सुरुवात करुन "आज्ञापत्र" हा ग्रंथ त्यानी तारीख १९ नोव्हेंबर १७१५ रोजी पूर्ण केला, असे तत्कालीन कागदपत्रावरुन दिसते.[६३] "आज्ञापत्र" पंताच्या राजकीय प्रगल्भतेची साक्ष देणारा ग्रंथ आहे. या आज्ञापत्राच्या लेखनानंतर अगदी थोड्याच दिवसांनी म्हणजे तारीख ८ फेब्रुवारी १७१६

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६०. खरे,वा.वा., उपरोक्त., पृ. २२.
६१. सगोसशाबा., पृ. ७६.
६२. खरे-भिडेआ., पृ. १-६.
६३. सगोसशाबा., पृ. ७६.

रोजी, पंतांचे निधन झाले.[६४] अशा त-हेने मराठा राज्यातील एका कर्तृत्ववान कर्त्या पुरुषाचे जीवन कार्य संपुष्टात आले.

.....

---

६४. प्रस्तुत प्रबंधातून., पृ.२७.